## आजचे पंचांग

मंगळवार, दि. २४ मार्च २०२६
द्वितीय परार्ध, श्वेतवाराह कल्प, वैवस्वत मन्वंतर, युगाब्द ५१२८, शालिवाहन शक १९४८, विक्रम संवत २०८२, पराभवनाम संवत्सर, उत्तरायण, वसंत ऋतु, चैत्र मास, शुक्लपक्ष, षष्ठी संध्याकाळी ४-०८ पर्यंत, दिवस नक्षत्र- रोहिणी संध्याकाळी ७-०५ पर्यंत, चंद्र रास- वृषभ रात्री (पहाटे पर्यंत) ६-१७ पर्यंत, सूर्य रास = मीन, गुरु रास= मिथुन

# दैनिक राज्य लोकतंत्र

नवी दिशा... नवे विचार...


## वसंत मोरेंना मोठा झटका

**पुणे** : पुणे शहराच्या राजकीय वर्तुळात मोठी खळबळ उडाली असून, उबाठा गटाचे आक्रमक नेते व माजी नगरसेवक वसंत मोरे यांच्या अडचणीत कमालीची वाढ झाली आहे. अनुसूचित जाती-जमाती (अत्याचार प्रतिबंध) कायद्यांतर्गत (अॅट्रॉसिटी अॅक्ट) दाखल गुन्ह्यात पुणे जिल्हा न्यायालयाने त्यांचा अटकपूर्व जामीन अर्ज फेटाळून लावला आहे. यामुळे शिवाजीनगर पोलीस ठाण्याकडून मोरे यांच्या अटकेची कारवाई कोणत्याही क्षणी होण्याची दाट शक्यता वर्तवली जात आहे.



## सारांश वृत्त

### मुख्यमंत्र्यांकडून शहीदांना अभिवादन

**नागपूर** : शहीद दिनानिमित्त मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी रामगिरी या शासकीय निवासस्थानी शहीद भगतसिंग, राजगुरू आणि सुखदेव यांच्या प्रतिमांना पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले. यावेळी त्यांनी स्वातंत्र्यलढ्यातील या क्रांतिकारकांच्या बलिदानाचे स्मरण करत त्यांच्या कार्यातून प्रेरणा घेण्याचे आवाहन केले.

### विजय वडेट्टीवार अडचणीत?

**वाशिम** : वाशिम जिल्ह्यात राजकीय वर्तुळात मोठी खळबळ उडवणारी घटना समोर आली आहे. काँग्रेसचे ज्येष्ठ नेते विजय वडेट्टीवार यांच्या विरोधात १०० कोटी रुपयांचा मानहानीचा दावा दाखल करण्यात आला असून, वाशिम जिल्हा न्यायालयाने हा दावा स्वीकारला आहे. हा दावा भाजपचे वाशिम जिल्हा निवडणूक प्रमुख भरत राजे उर्फ राजू पाटील राजे यांनी दाखल केला आहे. येथे घेतलेल्या पत्रकार परिषदेत त्यांनी याबाबत माहिती दिली. भरत पाटील राजे यांच्या मते, २८ डिसेंबर २०२५ रोजी विजय वडेट्टीवार यांनी सार्वजनिक माध्यमांसमोर त्यांच्यावर गंभीर आरोप केले होते. वाशिममधील कथित बनावट नोटा प्रकरणात गुन्हा दाखल असूनही अटक झालेली नाही असा आरोप वडेट्टीवार यांनी केला होता.

### अनधिकृत डंपिंगमुळे कालवा फुटला

**पुणे** : हडपसर औद्योगिक इस्टेट परिसरात शेजारील प्लॉटवर काही वर्षांपासून मोठ्या प्रमाणावर माती व कचऱ्याचे बेकायदेशीर डंपिंग सुरू असल्याचा प्रकार समोर आला आहे. या डंपिंगमुळे कालव्याला धोका निर्माण होऊन पूरस्थिती, आरोग्यविषयक समस्या आणि आर्थिक नुकसान होण्याची भीती वारंवार व्यक्त करण्यात आली होती. सोमवारी पहाटे कालवा फुटून ही भीती खरी ठरली.

## पुणे-पिंपरी महापालिकांवर दंडात्मक कारवाईची तयारी – विखे पाटील

# प्रक्रिया न करता सांडपाणी थेट नदीपात्रात

■ दैनिक राज्य लोकतंत्र



**मुंबई** : शहरातील सांडपाणी प्रक्रिया न करता थेट नदीच्या प्रवाहात सोडल्याने शेतीला दूषित पाणी मिळत असल्याच्या पार्श्वभूमीवर पुणे आणि पिंपरी-चिंचवड महानगरपालिकांवर दंडात्मक कारवाई करण्याचा निर्णय घेण्यात येणार असल्याची माहिती जलसंपदा मंत्री डॉ. राधाकृष्ण विखे पाटील यांनी विधानसभेत दिली.

हवेली तालुक्यातील नदीकाठच्या शेतीला दूषित पाणी मिळत असल्याबाबत आमदार ज्ञानेश्वर कटके यांनी लक्षवेधी सूचना मांडली होती. त्यावर उत्तर देताना मंत्री विखे पाटील म्हणाले की, वाढत्या पाणी वापरावर नियंत्रण ठेवणे आणि सांडपाणी प्रक्रिया क्षमता वाढवणे अत्यावश्यक झाले आहे. शेतकऱ्यांना शेतीसाठी प्रक्रिया केलेले स्वच्छ पाणी उपलब्ध करून देण्यासाठी आवश्यक ती पावले उचलली जातील.

पुणे शहरात मोठ्या प्रमाणावर सांडपाणी निर्माण होत असून त्यापैकी सुमारे ६.२० टीएमसी सांडपाण्यावर प्रक्रिया केली जाते. उर्वरित सांडपाणी थेट मुळा-मुठा नदीत सोडले जात असल्याने नदी प्रदूषणाचा प्रश्न गंभीर बनला आहे. नियमांनुसार सांडपाण्यावर पूर्ण प्रक्रिया केल्याशिवाय ते नदीत सोडणे बंधनकारक असून त्याचे उल्लंघन झाल्यास दंडाची तरतूद आहे, असे त्यांनी स्पष्ट केले.

पुणे महापालिकेकडून सध्या ४७७ एमएलडी क्षमतेची नऊ सांडपाणी शुद्धीकरण केंद्रे कार्यरत आहेत.

तसेच जपान इंटरनॅशनल को-ऑपरेशन एजन्सी (जायका) च्या सहकार्याने नवीन प्रकल्प उभारले जात असून काही प्रकल्प २०२६ पर्यंत पूर्ण होण्याचे नियोजन आहे. नव्याने समाविष्ट झालेल्या गावांसाठी 'अमृत २.०' अंतर्गत मलनिःसारण प्रकल्प राबविले जात आहेत.

दरम्यान, उजनी, जायकवाडी आणि कुकडीसारख्या धरणांमधील गाळ काढण्यासाठी राज्यस्तरीय धोरण तयार करण्यात येणार असून कुकडी धरणातील गाळ काढण्याची कार्यवाहीही हाती घेतली जाईल, असे मंत्री विखे पाटील यांनी सांगितले.

## व्यावसायिक एलपीजी कोट्यात ५० टक्क्यांपर्यंत वाढ

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**मुंबई** : देशातील व्यावसायिक एलपीजी गॅस पुरवठा सुरळीत करण्यासाठी केंद्र सरकारने महत्त्वाचा निर्णय घेत राज्यांना दिल्या जाणाऱ्या कोट्यात ५० टक्क्यांपर्यंत वाढ केली आहे. पेट्रोलियम आणि नैसर्गिक वायू मंत्रालयाचे सचिव डॉ. नीरज मित्तल यांनी याबाबत सर्व राज्यांच्या मुख्य सचिवांना पत्राद्वारे माहिती दिली असून, राज्य शासनाच्या सूचनेनुसार या निर्णयाची अंमलबजावणी केली जाणार असल्याची माहिती जिल्हाधिकारी डॉ. श्रीकृष्ण पांचाळ यांनी दिली.

नव्या धोरणानुसार, यापूर्वी देण्यात येणाऱ्या २० टक्के कोट्याबरोबरच सुधारित १० टक्के वाढीनंतर आता अतिरिक्त २० टक्के कोटा मंजूर करण्यात आला आहे. त्यामुळे एकूण पुरवठा संकटपूर्व पातळीच्या ५० टक्क्यांपर्यंत पोहोचला आहे. याचा सर्वाधिक लाभ रेस्टॉरंट्स, ढाबे, हॉटेल्स, औद्योगिक कॅन्टीन, अन्न प्रक्रिया उद्योग, दुग्धशाळा तसेच सरकारी अनुदानित अन्न केंद्रांना होणार आहे. स्थलांतरित कामगारांसाठी उपलब्ध असलेल्या ५ किलोच्या एफटीएल सिलिंडर पुरवठ्यालाही प्राधान्य देण्यात आले आहे.

दरम्यान, या सुविधेचा लाभ घेण्यासाठी काही अटी लागू करण्यात आल्या आहेत. सर्व व्यावसायिक आणि औद्योगिक ग्राहकांनी संबंधित तेल कंपन्यांकडे नोंदणी करणे बंधनकारक करण्यात आले आहे. ग्राहकांच्या वार्षिक वापराचा आणि क्षेत्राचा तपशील ठेवून गॅसचा गैरवापर टाळण्यावर भर दिला जाणार आहे. ज्या भागात पाईप गॅस सुविधा उपलब्ध आहे, तेथे ग्राहकांनी पीएनजीसाठी अर्ज करणे आणि त्याच्या वापराची तयारी दर्शविणे आवश्यक करण्यात आले आहे.

## मनपा वसाहतींसाठी स्वतंत्र धोरण; पुनर्विकासाला गती देणार

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**मुंबई** : पुणे महानगरपालिकेच्या जीर्ण झालेल्या वसाहतींच्या पुनर्विकासासाठी स्वतंत्र धोरण तयार करण्यात येणार असून त्याद्वारे रखडलेले प्रकल्प मार्गी लावले जातील, अशी माहिती राज्यमंत्री माधुरी मिसाळ यांनी विधानसभेत दिली.

या संदर्भात सदस्य हेमंत रासने यांनी लक्षवेधी सूचना मांडली होती. त्यावर उत्तर देताना मिसाळ म्हणाल्या की, शहरातील अनेक मनपा वसाहती अत्यंत जीर्ण अवस्थेत असून केवळ तात्पुरत्या दुरुस्तींनी हा प्रश्न सुटणारा नाही. स्ट्रक्चरल ऑडिटनंतर या वसाहतींच्या पुनर्विकासाची आवश्यकता स्पष्ट झाली आहे. साने गुरुजी वसाहतीतील ११ मजली इमारतीत १५२ घरांचे बांधकाम अंतिम टप्प्यात असून लॉटरी पद्धतीने त्यांचे वाटप करण्यात येणार आहे. तसेच राजेंद्रनगर, घोरपडे पेठ आणि गंजपेठ येथील सुमारे ४०० घरे भाडे तत्त्वावर उपलब्ध करून देण्यात आली आहेत.

सध्याच्या धोरणानुसार कर्मचारी सेवानिवृत्त झाल्यानंतर घरे परत करणे अपेक्षित असते. मात्र, रहिवाशांकडून मालकी हक्काची मागणी आणि ट्रांझिट कॅम्पमध्ये स्थलांतरास विरोध यामुळे अनेक प्रकल्प रखडल्याचे त्यांनी नमूद केले. राजेंद्रनगर येथील पुनर्विकासासाठी काढलेल्या निविदाही याच कारणांमुळे रद्द कराव्या लागल्या होत्या. याशिवाय, विविध वसाहती स्वतंत्र लेआउटमध्ये असल्यामुळे एफएसआयशी संबंधित अडचणी निर्माण होत असल्याचेही त्यांनी सांगितले.

## तीन महिन्यांत सर्वेक्षण करून दोषींवर गुन्हे – बावनकुळे

# अवैध खनिज उत्खननावर कडक कारवाई

■ दैनिक राज्य लोकतंत्र



**मुंबई:** भिवंडी परिसरासह रायगड आणि पालघर जिल्ह्यात सुरू असलेल्या बेकायदा खनिज उत्खनन व तस्करीविरोधात राज्य सरकारने कडक भूमिका घेतली असून पुढील तीन महिन्यांत व्यापक सर्वेक्षण करून दोषींवर कठोर कारवाई करण्यात येणार असल्याची माहिती महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी विधानसभेत दिली. या संदर्भात सदस्य सुनील प्रभू यांनी लक्षवेधी सूचना मांडली होती. चर्चेत सदस्य दिलीप लांडे, राजू खरे आणि नाना पटोले यांनी सहभाग घेतला.

मंत्री बावनकुळे म्हणाले की, मागील पाच वर्षांत देण्यात आलेल्या खनन परवानग्यांची सखोल चौकशी केली जाणार आहे. अनियमितता आढळल्यास संबंधितांवर दंड, व्याज आकारणीसह फौजदारी गुन्हे दाखल केले जातील. तसेच या प्रकरणांत अधिकारी दोषी आढळल्यास त्यांच्यावरही कठोर कारवाई केली जाईल.

राज्यातील बेकायदा खाणकाम आणि स्टोन क्रशर प्रकल्पांवर तत्काळ बंदीची कारवाई सुरू करण्यात आली असून गुन्हे नोंदविणे, दंड वसुली आणि अवैध साठा जप्त करण्याचे आदेश देण्यात आले आहेत. आवश्यक खाणपट्टा, पर्यावरण परवाना, स्फोटक वापर परवाना आणि ग्रामपंचायतीचा ना हरकत दाखला न घेता अनेक ठिकाणी कामे सुरू असल्याचे निदर्शनास आले आहे. या पार्श्वभूमीवर जीपीएस आणि गूगल मॅपिंगच्या माध्यमातून राज्यभर सर्वेक्षण करून अवैध उत्खननाचे अचूक चित्र समोर आणले जाणार आहे. ज्या ठिकाणी परवानगीशिवाय खाणकाम सुरू आहे, ते तत्काळ बंद करण्यात येईल. जिल्हाधिकाऱ्यांना या कारवाईची थेट जबाबदारी देण्यात आली आहे. परवानाधारक प्रकल्पांना कोणताही अडथळा न आणता अवैध उत्खनन पूर्णपणे बंद करण्याचा सरकारचा निर्धार असल्याचेही बावनकुळे यांनी स्पष्ट केले.

# महावितरणच्या तक्रारींची सखोल चौकशी

## मेघना साकोरे-बोर्डीकर यांची माहिती

■ दैनिक राज्य लोकतंत्र




**मुंबई** : महावितरणच्या विविध परिमंडळांतील कामांबाबत आलेल्या तक्रारींची सखोल चौकशी करण्यात येणार असल्याची माहिती राज्यमंत्री मेघना साकोरे-बोर्डीकर यांनी विधानसभेत दिली. बारामती, पुणे, नाशिक आणि कोल्हापूर परिमंडळांमध्ये आर. एन. इलेक्ट्रिकल्स या कंत्राटदाराकडून बनावट बिलिंग, आर्थिक अपहार आणि निकृष्ट दर्जाच्या कामांमुळे अपघात झाल्याच्या तक्रारी सदस्यांनी मांडल्या होत्या. या संदर्भात सदस्य महेश सावंत यांनी लक्षवेधी सूचना मांडली होती. चर्चेत सदस्य राजू तोडसाम, अभिजित पाटील आणि प्रशांत बंब यांनीही सहभाग घेतला.

राज्यमंत्री साकोरे-बोर्डीकर म्हणाल्या की, आतापर्यंत झालेल्या प्राथमिक चौकशीत संबंधित कंत्राटदाराविरोधात ठोस निष्कर्ष समोर आलेले नाहीत. संबंधित एजन्सीने ज्या ठिकाणी कामे केली आहेत, तेथे अपघात झाल्याची नोंद आढळलेली नाही. कोल्हापूर परिमंडळात या कंत्राटदाराला काम देण्यात आलेले नसून इतर परिमंडळांतील कामांचीही वरिष्ठ अधिकाऱ्यांमार्फत तपासणी करण्यात आली आहे. तथापि, सदस्यांनी मांडलेल्या विशिष्ट तक्रारी आणि मुद्द्यांचा पुनर्विचार करून सखोल चौकशी केली जाईल. चौकशीत दोष आढळल्यास आवश्यक ती कारवाई केली जाईल, असे त्यांनी स्पष्ट केले.

महावितरणकडून सर्व कामांची वेळेत पूर्तता व्हावी यासाठी सातत्याने पाठपुरावा केला जातो. अपघाताच्या घटनांमध्ये संबंधितांना मदत देण्याची कार्यवाहीही केली जाते, असे त्यांनी सांगितले. कामे देताना पात्र एजन्सींना नियमानुसार मान्यताप्राप्त यादीत समाविष्ट करूनच कंत्राटे दिली जातात. संबंधित एजन्सीलाही या प्रक्रियेनुसार काम देण्यात आले आहे. तसेच, पॉवर ट्रान्सफॉर्मर आणि ब्रेकरसारखे महत्त्वाचे साहित्य महावितरणकडून पुरवले जाते, तर किरकोळ साहित्य कंत्राटदारांकडून वापरले जाते, असेही त्यांनी नमूद केले. सदस्यांनी उल्लेख केलेल्या काही अपघातांच्या घटनांमध्ये संबंधित एजन्सीने त्या ठिकाणी काम केलेले नसल्याने त्यांना जबाबदार धरणे योग्य ठरणार नाही, असेही राज्यमंत्र्यांनी स्पष्ट केले.

### पुणे शहराला मुबलक पाणी?

**पुणे** : शहराला मुळशी धरणातून सात टीएमसी पाणी देण्याची सकारात्मक भूमिका राज्य शासनाने घेतल्याने पुणेकरांना मुबलक पाणी मिळण्याचा मार्ग मोकळा होऊ शकतो. शहरासह नव्याने समाविष्ट गावांना पाणी देण्यासाठी महापालिकेला २१.०३ टीएमसी पाण्याची वार्षिक गरज आहे. जलसंपदा विभाग शहराला केवळ १४.६१ टीएमसी पाणी दिले जात आहे. त्यामुळे मुळशी धरणाचे पाणी मिळाल्यास पुणेकरांना मोठा दिलासा मिळणार आहे. संपूर्ण शहरासाठी पाणी वितरण व्यवस्था उभारावी लागणार आहे. त्यासाठी जवळपास चार ते पाच हजार कोटींच्या निधीची गरज लागणार आहे.

# टीपी योजनेतून वणीचा सर्वांगीण विकास

## पायाभूत सुविधांना मोठा चालना – माधुरी मिसाळ

■ दैनिक राज्य लोकतंत्र



**मुंबई** : यवतमाळ जिल्ह्यातील वणी शहराच्या नियोजनबद्ध आणि सर्वांगीण विकासासाठी टाउन प्लॅनिंग (टीपी) योजना प्रभावी ठरत असून या माध्यमातून मोठ्या प्रमाणात पायाभूत सुविधा उभारल्या जात असल्याची माहिती राज्यमंत्री माधुरी मिसाळ यांनी विधानसभेत दिली. या संदर्भात सदस्य संजय देरकर यांनी लक्षवेधी सूचना मांडली होती.

राज्यमंत्री मिसाळ म्हणाल्या की, टीपी योजनेअंतर्गत शहरात रस्ते, दवाखाने, उद्याने, मैदाने तसेच आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांसाठी (ईडब्ल्यूएस) गृहनिर्माण प्रकल्पांसाठी आवश्यक जागा उपलब्ध होत आहे. या योजनेमुळे नगरपरिषदेला काही क्षेत्र विनामूल्य मिळाले असून त्यामुळे विकासकामांना गती मिळाली आहे.

टीपी योजनांसाठी आवश्यक निधी उपलब्ध करून देण्यात आला असून वणी नगरपरिषदेला विशेष आर्थिक सहाय्य देण्यात आले आहे.

तसेच 'अमृत' योजनेतूनही मोठ्या प्रमाणात निधी मिळाल्याने विविध पायाभूत प्रकल्पांना चालना मिळत आहे.

राज्य शासनाकडून पायाभूत सुविधांसाठी कोट्यवधी रुपयांचा निधी मंजूर करण्यात आला असून विविध विकासकामे सुरू आहेत. भविष्यातही आवश्यकतेनुसार निधी उपलब्ध करून देण्यात येईल, असेही त्यांनी स्पष्ट केले.

## डॉ. राधाकृष्ण विखे पाटील यांची सभागृहात माहिती

# निरा देवधरमुळे ४३ हजार हेक्टर क्षेत्र सिंचनाखाली

■ दैनिक राज्य लोकतंत्र



**मुंबई** : निरा देवधर प्रकल्पामुळे भोर, खंडाळा, फलटण आणि माळशिरस या चार तालुक्यांतील एकूण ४३,०५० हेक्टर क्षेत्र सिंचनाखाली येणार असल्याची माहिती जलसंपदामंत्री डॉ. राधाकृष्ण विखे पाटील यांनी विधानसभेत दिली. या संदर्भात आमदार उत्तमराव जानकर यांनी लक्षवेधी सूचना मांडली होती. त्यावर उत्तर देताना मंत्री विखे पाटील म्हणाले की, निरा देवधर आणि गुंजवणी धरणाच्या कालव्यांची कामे पूर्ण होईपर्यंत समन्यायी तत्त्वावर तात्पुरत्या स्वरूपात पाणी वाटप करण्यात येत आहे.

माळशिरस तालुक्यातील १६ दुष्काळग्रस्त गावांसाठी सहकारी उपसा सिंचन योजनेऐवजी शासकीय उपसा सिंचन योजना राबविण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. २७ ऑक्टोबर २०२५ च्या शासन निर्णयानुसार या योजनेला मंजुरी मिळाली असून सध्या क्षेत्रीय स्तरावर सर्वेक्षणाचे काम सुरू आहे. लवकरच या योजनेचा समावेश सुधारित प्रशासकीय मान्यता अहवालात करण्यात येणार आहे.

मंत्री विखे पाटील यांनी सांगितले की, निरा देवधर मुख्य कालव्याचे १ ते ६५ किलोमीटरपर्यंतचे काम पारंपरिक पद्धतीने पूर्ण झाले असून २०१६-१७ पासून नियमित पाणी सोडले जात आहे. उर्वरित ६५ ते १३५ किलोमीटरचा भाग 'बंदिस्त नलिका वितरण प्रणाली'द्वारे पूर्ण करण्याचे नियोजन असून ते काम सध्या प्रगतीपथावर आहे. या प्रकल्पासाठी आर्थिक वर्ष २०२५-२६ मध्ये २७४ कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली असून त्यापैकी १९६ कोटी रुपये खर्च झाले आहेत. तसेच गुंजवणी प्रकल्पासाठी मंजूर ५० कोटी रुपयांचा निधी पूर्णतः खर्च करण्यात आला आहे.

या प्रकल्पामुळे दुष्काळग्रस्त भागातील पाण्याचा प्रश्न मोठ्या प्रमाणात सुटण्यास मदत होईल, असा विश्वास मंत्री विखे पाटील यांनी व्यक्त केला. या चर्चेत आमदार दिलीप लांडे, विजय शिवतारे आणि शरद सोनावणे यांनी सहभाग घेतला.

## महाराष्ट्र लोकभवनात बिहार राज्य स्थापना दिवस साजरा

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**मुंबई** : राज्यपाल जिष्णु देव वर्मा यांच्या प्रमुख उपस्थितीत महाराष्ट्र लोकभवन येथे 'बिहार राज्य स्थापना दिवस' उत्साहात साजरा करण्यात आला. 'एक भारत श्रेष्ठ भारत' उपक्रमांतर्गत मुंबई विद्यापीठाच्या सहकार्याने या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.

यावेळी बोलताना राज्यपालांनी बिहार राज्याच्या ऐतिहासिक आणि सांस्कृतिक योगदानावर प्रकाश टाकला. "बिहार ही संस्कृती, अध्यात्म आणि तत्त्वज्ञानाची भूमी आहे. भगवान महावीर आणि भगवान बुद्ध यांसारख्या महापुरुषांची ही जन्मभूमी असून, संसदीय परंपरांचीही पाळेमुळे याच भूमीत आढळतात," असे त्यांनी नमूद केले.

भारत हा केवळ भौगोलिक सीमा किंवा प्रशासनापुरता मर्यादित नसून सांस्कृतिक एकात्मतेचा देश असल्याचे सांगत, विविधतेत एकता ही भारताची ओळख असल्याचे त्यांनी अधोरेखित केले. बिहारमधील लोक देशभरात विविध क्षेत्रांत योगदान देत असल्याचेही त्यांनी नमूद केले. या कार्यक्रमात मुंबई विद्यापीठाच्या विद्यार्थ्यांनी बिहारच्या लोकपरंपरेचे दर्शन घडवणारे सांस्कृतिक सादरीकरण केले. मिथिला प्रदेशातील झिझिया आणि जट-जटिन ही लोकनृत्ये तसेच भोजपुरी गीतांनी उपस्थितांची दाद मिळवली. मुंबई विद्यापीठाचे कुलगुरू प्रा. रविंद्र कुलकर्णी आणि प्रकुलगुरू प्रा. अजय भामरे यांनी राज्यपालांचा सत्कार केला. कार्यक्रमाला विविध अधिकारी, प्राध्यापक, विद्यार्थी आणि कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## संपादकीय

# कच्च्या तेलाच्या सावलीतला सूर्यप्रकाश



**भारताची ऊर्जा सुरक्षितता अजूनही परदेशातून येणाऱ्या तेलावर आधारलेली आहे. पण पश्चिम आशियातील तणाव, समुद्री मार्गांवरील धोके आणि अस्थिर किंमती यामुळे हे अवलंबित्व अधिकच धोकादायक ठरत आहे. या पार्श्वभूमीवर नवीकरणीय ऊर्जेकडे वेगाने वळणे अपरिहार्य ठरते आहे.**

भारताच्या आर्थिक वाढीचा पाया ऊर्जा आहे आणि त्या ऊर्जेचा कणा आजही आयातीत तेलावर उभा आहे. दररोज लाखो बॅरल तेल समुद्रमार्गाने भारतात पोहोचते आणि त्या प्रत्येक टँकरसोबत अनिश्चिततेची सावलीही येते. हॉर्मुझसारख्या सामुद्रधुनीत निर्माण होणारा तणाव असो किंवा पश्चिम आशियातील संघर्ष, या प्रत्येक घटनेचा थेट परिणाम भारताच्या अर्थकारणावर होतो. ऊर्जा सुरक्षेचा प्रश्न त्यामुळे केवळ पुरवठ्याचा राहत नाही, तर तो राष्ट्रीय स्थैर्याशी निगडित होतो. भारताने गेल्या काही दशकांत ऊर्जा स्रोतांचे विविधीकरण करण्याचा प्रयत्न केला. रशिया, अमेरिका, आफ्रिका अशा विविध भागांतून तेल खरेदी करून जोखीम कमी करण्याचा प्रयत्न झाला. सामरिक साठे उभारण्यावर भर देण्यात आला. परंतु या सर्व उपाययोजना संकट कमी करतात, संकट टाळत नाहीत. कारण मूळ समस्या आयात अवलंबित्वाची आहे. जोपर्यंत देशाची ऊर्जा गरज मोठ्या प्रमाणात परदेशी स्रोतांवर आधारित राहील, तोपर्यंत ही असुरक्षितता कायम राहणार. याच ठिकाणी नवीकरणीय ऊर्जेचा प्रश्न केवळ पर्यावरणापुरता मर्यादित राहत नाही, तर तो धोरणात्मक बनतो. सूर्यप्रकाश, वारा, जलस्रोत हे भारतात मुबलक आहेत आणि त्यांच्यावर कोणत्याही बाह्य राजकारणाचे नियंत्रण नाही. त्यामुळे या स्रोतांचा वापर वाढवणे म्हणजे ऊर्जा स्वायत्ततेकडे जाणे होय. आतापर्यंत नवीकरणीय ऊर्जेकडे प्रामुख्याने हवामान बदलाच्या दृष्टीने पाहिले गेले, परंतु आता त्याचा विचार राष्ट्रीय सुरक्षेच्या चौकटीत करणे आवश्यक झाले आहे. भारताने या दिशेने काही महत्त्वाची पावले उचलली आहेत. सौर ऊर्जेच्या उत्पादनात मोठी वाढ झाली आहे, पवन ऊर्जेचे प्रकल्प विस्तारले आहेत आणि हरित हायड्रोजनसारख्या नव्या संकल्पनांवरही भर दिला जात आहे. जगात सर्वाधिक वेगाने नवीकरणीय ऊर्जा क्षमता वाढवणाऱ्या देशांमध्ये भारताचा समावेश होतो. परंतु या प्रगतीकडे समाधानाने पाहण्याची वेळ अजून आलेली नाही. कारण एकीकडे नवीकरणीय ऊर्जा वाढत असताना दुसरीकडे कोळसा आणि तेल यांवरील अवलंबित्व अजूनही मोठे आहे. या संक्रमणातील सर्वात मोठे आव्हान म्हणजे सातत्य. सौर आणि पवन ऊर्जा या नैसर्गिकरित्या अनियमित आहेत. सूर्य मावळल्यानंतर किंवा वारा शांत झाल्यानंतर ऊर्जा निर्मिती थांबते. त्यामुळे ऊर्जा साठवणूक ही कळीची बाब ठरते. बॅटरी तंत्रज्ञान, ग्रीड व्यवस्थापन आणि वितरण यंत्रणा यामध्ये गुंतवणूक करणे आवश्यक आहे. अन्यथा निर्माण झालेली ऊर्जा प्रभावीपणे वापरात येणार नाही. ऊर्जा संक्रमणाचा आर्थिक पैलूही तितकाच महत्त्वाचा आहे. काही वर्षांपूर्वीपर्यंत नवीकरणीय ऊर्जा महाग मानली जात होती. परंतु तंत्रज्ञानातील प्रगतीमुळे सौर ऊर्जा स्वस्त होत चालली आहे. अनेक प्रकल्पांमध्ये ती पारंपरिक ऊर्जेपेक्षा स्पर्धात्मक ठरत आहे. त्यामुळे गुंतवणूकदारांचा कलही या क्षेत्राकडे वाढत आहे. भविष्यातील ऊर्जा अर्थकारण हे इंधनावर नव्हे, तर तंत्रज्ञानावर आधारित असेल, हे स्पष्ट होत आहे. तथापि, या बदलासाठी धोरणात्मक सातत्य आवश्यक आहे. ऊर्जा क्षेत्रातील निर्णय दीर्घकालीन परिणाम करणारे असतात. पायाभूत सुविधा उभारणी, संशोधन व विकास, आणि कौशल्यविकास यांमध्ये सातत्यपूर्ण गुंतवणूक केल्याशिवाय ऊर्जा संक्रमण यशस्वी होणार नाही. यात आणखी एक महत्त्वाचा मुद्दा म्हणजे स्थानिक उत्पादन. सौर पॅनेल, बॅटरी आणि संबंधित उपकरणे यासाठी भारत अजूनही मोठ्या प्रमाणात आयातीवर अवलंबून आहे. त्यामुळे ऊर्जा स्वावलंबनाचा उद्देश पूर्णपणे साध्य होत नाही. या क्षेत्रात देशांतर्गत उत्पादन वाढवणे आणि पुरवठा साखळी मजबूत करणे आवश्यक आहे. अन्यथा एका प्रकारच्या अवलंबित्वातून बाहेर पडताना दुसऱ्या प्रकारच्या अवलंबित्वात अडकण्याचा धोका राहील. भारताची वाढती ऊर्जा मागणी ही आव्हान आहे, तसेत ती संधीही आहे. विकसित देशांप्रमाणे आधी प्रदूषण करून नंतर स्वच्छ ऊर्जेकडे वळण्याचा मार्ग भारताला परवडणारा नाही. त्याऐवजी थेट नवीकरणीय ऊर्जेकडे झेप घेण्याची संधी भारतासमोर आहे. यासाठी आवश्यक ते धोरणात्मक धैर्य आणि नियोजन आवश्यक आहे. ऊर्जा सुरक्षेचा प्रश्न हा केवळ अर्थकारणाचा नाही, तर सार्वभौमत्वाचा आहे. परदेशी तेलावर अवलंबून असलेली अर्थव्यवस्था नेहमीच बाह्य धक्क्यांना असुरक्षित राहते. त्याउलट स्वदेशी ऊर्जास्रोतांवर आधारित व्यवस्था अधिक स्थिर आणि स्वायत्त असते. त्यामुळे नवीकरणीय ऊर्जेकडे वळणे हे केवळ पर्यावरणपूरक निर्णय नसून राष्ट्रीय हिताचा भाग आहे. भारताने आता निवड करायची आहे. सावलीत राहायचे की सूर्यप्रकाशात पुढे जायचे. ही निवड जितक्या लवकर आणि ठामपणे केली जाईल, तितक्या वेगाने भारत ऊर्जा स्वातंत्र्याकडे वाटचाल करू शकेल.

# प्रश्न पदवीधरांचा की देशांतर्गत व्यवस्थेचा?

**» भारताची लोकसंख्या 'डेमोग्राफिक डिव्हिडंड' मानली जाते; पण रोजगारनिर्मितीतील कुचराई आणि शिक्षणातील विसंगती यामुळे हेच भांडवल ओझे ठरण्याची भीती आहे. पदवीधरांची संख्या वाढत असताना रोजगाराचे स्वरूपही बदलत आहे. यातील तफावत भरून काढण्याचे प्रयत्न अपुरेच दिसतात.**



भारताच्या अर्थव्यवस्थेबाबत एक जुना समज आहे आणि की म्हणजे वाढ होते, पण नोकऱ्या निर्माण होत नाहीत. आणि शिक्षणाबाबत दुसरा. पदव्या मिळतात, पण कौशल्ये नाहीत. या दोन अपूर्णतांचा संगम म्हणजे आजची भारतातील 'रोजगार-व शिक्षण विसंगती' होय.

ही विसंगती केवळ आकडेवारीत नाही; ती समाजाच्या रचनेत खोलवर झिरपलेली आहे. एका बाजूला लाखो तरुण उच्चशिक्षित होऊन रोजगाराच्या प्रतीक्षेत आहेत, तर दुसऱ्या बाजूला उद्योगांना योग्य कौशल्यधारक मनुष्यबळ मिळत नाही. परिणामी, बेरोजगारी आणि अपुऱ्या रोजगाराचे विचित्र सहअस्तित्व निर्माण झाले आहे.

या परिस्थितीचे मूळ शिक्षणव्यवस्थेत आहे. भारतातील बहुतांश शिक्षण अजूनही ज्ञानकेंद्रित आहे, कौशल्यकेंद्रित नाही. पदवी ही अंतिम ध्येय मानली जाते; रोजगारक्षमतेची कसोटी मात्र वेगळीच असते. उद्योगक्षेत्राला हव्या असलेल्या कौशल्यांची जुळवणी शिक्षणसंस्थांमध्ये होत नाही. त्यामुळे 'शिक्षित बेरोजगार' हा शब्दप्रयोग केवळ भाषिक नाही, तर आर्थिक वास्तव बनला आहे.

यात भर म्हणजे भारतातील कामगार शक्तीचा मोठा भाग अनौपचारिक क्षेत्रात आहे. अशा परिस्थितीत औपचारिक प्रशिक्षण किंवा कौशल्यविकास यांची संधी मर्यादित राहते. अनेकांना कौशल्ये मिळतात ती 'काम करता करता', म्हणजेच अनौपचारिक पद्धतीने. त्यामुळे उत्पादकता कमी राहते आणि अर्थव्यवस्थेच्या गुणवत्तापूर्ण वाढीवर मर्यादा येतात.

महिलांच्या बाबतीत ही समस्या अधिक गंभीर आहे. शिक्षणाचे प्रमाण वाढूनही त्यांचा कामगार सहभाग दर अत्यल्प आहे. सामाजिक बंधने, सुरक्षिततेचे प्रश्न आणि रोजगाराच्या मर्यादित संधी यामुळे मोठा मानवी संसाधनसाठा निष्क्रिय राहतो. ही केवळ सामाजिक समस्या नाही; ती आर्थिक नुकसानाचीही बाब आहे.

याच ठिकाणी धोरणात्मक हस्तक्षेपाची गरज निर्माण होते. 'रोजगारनिर्मिती' हा शब्द फक्त घोषणांपुरता मर्यादित राहून चालणार नाही. कोणत्या प्रकारच्या नोकऱ्या निर्माण होतात, त्यासाठी कोणती कौशल्ये आवश्यक आहेत आणि त्या कौशल्यांची पूर्तता कशी होणार, याचा एकत्रित विचार करावा लागेल.


राष्ट्रीय शिक्षण धोरणासारख्या उपक्रमांनी या दिशेने काही बदल सुचवले आहेत, पण त्यांची अंमलबजावणी महत्त्वाची ठरते. व्यावसायिक शिक्षण, अप्रेंटिसशिप, उद्योग-संस्था भागीदारी या गोष्टी अजूनही मर्यादित प्रमाणात आहेत. शिक्षणसंस्थांनी उद्योगांच्या गरजांशी स्वतःला जुळवून घेणे आवश्यक आहे; अन्यथा पदवी आणि रोजगार यांच्यातील दरी अधिकच वाढेल. तसेच, रोजगाराच्या गुणवत्तेकडे लक्ष देणेही गरजेचे आहे. केवळ नोकऱ्यांची संख्या वाढवणे पुरेसे नाही; त्या नोकऱ्या उत्पादक, टिकाऊ आणि योग्य वेतन देणाऱ्या असाव्यात. अन्यथा, 'अल्पउत्पादक रोजगार' ही नवी समस्या निर्माण होते, जी दीर्घकालीन आर्थिक प्रगतीस अडथळा ठरते.

या संदर्भात तंत्रज्ञानाचा प्रभावही महत्त्वाचा आहे. स्वयंचलन आणि कृत्रिम बुद्धिमत्ता यामुळे पारंपरिक नोकऱ्या कमी होत आहेत, तर नवीन कौशल्यांची मागणी वाढत आहे. या बदलत्या वास्तवाशी जुळवून घेण्यासाठी शिक्षणव्यवस्था अधिक लवचिक आणि गतिमान असणे आवश्यक आहे. भारताकडे आज जगातील सर्वात मोठ्या तरुण लोकसंख्येचे बळ आहे. पण हीच लोकसंख्या जर योग्य प्रकारे कौशल्यसंपन्न झाली नाही, तर ती संधीऐवजी संकट ठरू शकते. 'डेमोग्राफिक डिव्हिडंड'चे 'डेमोग्राफिक डिसॲडव्हांटेज'मध्ये रूपांतर होऊ नये, यासाठी शिक्षण आणि रोजगार या दोन क्षेत्रांतील विसंगती दूर करणे अपरिहार्य आहे. हा प्रश्न केवळ अर्थकारणाचा नाही, तर व्यवस्थेच्या दृष्टीकोनाचा आहे. पदवीपेक्षा कौशल्याला, प्रमाणापेक्षा गुणवत्तेला आणि घोषणांपेक्षा अंमलबजावणीला प्राधान्य दिले तरच या प्रश्नाचे समाधान शक्य आहे. अन्यथा, शिक्षण आणि रोजगार यांच्यातील दरी हीच भारताच्या प्रगतीची सर्वात

# मेट्रो कामामुळे निगडी-आकुर्डी मार्ग धोकादायक

## चिखल, बांधकाम साहित्यामुळे अपघातांची मालिका

■ दैनिक राज्य लोकतंत्र



**पिंपरी :** पिंपरी-चिंचवड शहरातील निगडी ते आकुर्डी मार्गावर सुरू असलेल्या मेट्रो बांधकामामुळे रस्त्याची अवस्था अत्यंत खराब झाली असून, वाहनचालकांसाठी हा मार्ग धोकादायक ठरत आहे. रस्त्यावर साचलेला चिखल, विखुरलेले बांधकाम साहित्य आणि अपुऱ्या सुरक्षाव्यवस्थेमुळे विशेषतः दुचाकीस्वारांना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत आहे. किरकोळ अपघातांच्या घटनांमध्ये वाढ झाली असून, गंभीर अपघाताचीही भीती व्यक्त केली जात आहे.

पिंपरी ते भक्ती-शक्ती मार्गादरम्यान सुरू असलेल्या मेट्रो प्रकल्पासाठी रस्त्याच्या मध्यभागी पिलर उभारणीचे काम सुरू आहे. या कामासाठी अनेक ठिकाणी लोखंडी पत्रे टाकण्यात आली असली, तरी ती अपुरी पडत असल्याने बांधकामासाठी वापरले जाणारे दगड, विटा, मुरूम आणि वाळू थेट रस्त्यावर पसरलेले दिसत आहेत. याशिवाय, बांधकामासाठी वापरलेले पाणी रस्त्यावर वाहत येत असल्याने चिखल साचून रस्ता निसरडा झाला आहे. याचा सर्वाधिक फटका दुचाकीस्वारांना बसत आहे. वाहतुकीचा ताण वाढलेला असताना अशा स्थितीत वाहन चालवणे धोकादायक बनले आहे.

परिस्थिती अधिक गंभीर होण्यामागे काही प्रमुख कारणे समोर येत आहेत. रस्त्यावर साचलेला चिखल आणि बांधकाम साहित्य, अपुरी सुरक्षा उपाययोजना, वाढता वाहतुकीचा ताण आणि रात्रीच्या वेळी अपुरा प्रकाश या सर्व बाबी अपघातांच्या धोक्यात भर घालत आहेत. स्थानिक नागरिकांनी याबाबत प्रशासनाकडे अनेकदा तक्रारी केल्याचे सांगितले जात असले, तरी अद्याप ठोस उपाययोजना करण्यात आलेली नाही. दरम्यान, शहरातील अग्निशमन विभागाने पुढाकार घेत मेट्रो प्रशासन आणि महापालिकेच्या आरोग्य विभागाला परिस्थितीची माहिती दिली आहे. मात्र, त्यानंतरही परिस्थितीत अपेक्षित सुधारणा झालेली नाही. या पार्श्वभूमीवर, अपघात टाळण्यासाठी तातडीने उपाययोजना करणे आवश्यक असल्याची मागणी नागरिकांकडून होत आहे. अन्यथा, एखादा मोठा अपघात घडण्याची शक्यता नाकारता येत नाही.

# प्लास्टिक वापरावर धडक कारवाई

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**पिंपरी :** पिंपरी-चिंचवड महापालिकेच्या 'क' क्षेत्रीय कार्यालयांतर्गत आरोग्य विभागाने प्लास्टिक वापर आणि अस्वच्छतेविरोधात धडक मोहीम राबवत नागरिक व व्यावसायिकांवर कारवाई केली. या कारवाईत एकूण ३१ हजार रुपयांचा दंड वसूल करण्यात आला असून, मोठ्या प्रमाणात प्लास्टिक साहित्यही जप्त करण्यात आले आहे.

उपायुक्त डॉ. प्रदीप ठेंगल, सहाय्यक आयुक्त किरणकुमार मोरे आणि क्षेत्रीय अधिकारी अजिंक्य येळे यांच्या मार्गदर्शनाखाली मुख्य आरोग्य निरीक्षक वैभव घोळवे यांच्या पथकाने ही कारवाई केली.

इंद्रायणी नगर परिसरात प्लास्टिकचा वापर करणाऱ्या व्यावसायिकांवर कारवाई करत १० हजार रुपयांचा दंड वसूल करण्यात आला. तसेच पाच किलो प्लास्टिक जप्त करण्यात आले. याच परिसरात कचरा टाकणे, अस्वच्छता आणि प्लास्टिक वापर करणाऱ्यांवर पुन्हा कारवाई करत आणखी ८ हजार रुपयांचा दंड आकारण्यात आला. या कारवाईत तीन किलो प्लास्टिक जप्त करण्यात आले. आरोग्य सहाय्यक गीता रिल आणि जगदीश चिंचोलीकर यांच्या पथकाने ही मोहीम राबविली. प्रशासनाकडून शहरात प्लास्टिकमुक्ती आणि स्वच्छतेसाठी सातत्याने कठोर कारवाई केली जात असल्याचे स्पष्ट झाले आहे. पर्यावरण संरक्षण आणि नागरिकांच्या आरोग्याच्या दृष्टीने प्लास्टिकचा वापर टाळणे अत्यावश्यक असल्याचे प्रशासनाने नमूद केले आहे.

# गॅसपुरवठा पूर्वपदावर; पुण्यात ८३ हजार सिलिंडरचे वितरण

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**पुणे :** युद्धजन्य परिस्थितीमुळे निर्माण झालेल्या घरगुती गॅस टंचाईनंतर आता जिल्ह्यात पुरवठा हळूहळू सुरळीत होत असल्याचे चित्र दिसत आहे. शनिवारी दिवसभरात सुमारे ७२ हजार बुकिंग नोंदवली गेली, तर ८३ हजारांहून अधिक सिलिंडरचे वितरण करण्यात आल्याची माहिती प्रशासनाने दिली.

सिलिंडर वितरण सुरळीत ठेवण्यासाठी आधीच बुकिंग केलेल्या ग्राहकांना प्राधान्य देण्याच्या सूचना गॅस एजन्सींना देण्यात आल्या आहेत. ज्या एजन्सींकडे बुकिंगचा ताण अधिक आहे, त्यांना प्राधान्याने पुरवठा केला जात असून, प्रतीक्षेत असलेल्या ग्राहकांना लवकरात लवकर सिलिंडर मिळावा यासाठी अतिरिक्त कोटा देण्यात येत आहे. शनिवारी जिल्ह्यात एकूण ७० हजार ८५९ सिलिंडरचे बुकिंग झाले होते. त्याचवेळी गॅस कंपन्यांकडून एजन्सींना ९० हजार १ सिलिंडरचा पुरवठा करण्यात आला. त्यापैकी प्रत्यक्ष ग्राहकांना ८३ हजार ४४० सिलिंडर वितरित करण्यात आले. मागणीपेक्षा सुमारे १३ हजार सिलिंडर अधिक वितरित करण्यात आल्याने साठ्यातील तूट भरून निघत असल्याचे प्रशासनाचे म्हणणे आहे. तीन ते चार दिवसांत सर्व ग्राहकांना सिलिंडर मिळतील आणि त्यानंतर रोजचा पुरवठा पूर्णपणे सुरळीत होईल.

# मटारच्या दरात मोठी वाढ; भाजीपाला दर स्थिर

## उन्हाच्या तीव्रतेमुळे लिंबाच्या दरात वाढ

■ दैनिक राज्य लोकतंत्र



**पिंपरी :** पिंपरीतील लालबहादूर शास्त्री भाजी मंडईत रविवारी मटारची आवक घटल्याने दरात मोठी वाढ झाली. मटारचे दर थेट ४० रुपयांवरून १०० रुपये किलोपर्यंत पोहोचले असून, ग्राहकांना त्याचा फटका बसत आहे. दुसरीकडे बहुतांश फळभाज्यांचे दर स्थिर राहिले असले, तरी उन्हाच्या तीव्रतेमुळे लिंबाच्या दरात वाढ झाली आहे.

बाजारात कैरी १०० रुपये किलो दराने विक्री होत असून, लिंबू १२० रुपये किलोवर पोहोचले आहेत. वांग्याचे दर सुमारे ६० रुपये किलो आहेत. शेवग्याची आवक वाढल्याने त्याचे दर काहीसे कमी झाले आहेत. पालेभाज्यांचे दर मात्र स्थिर असून कोथिंबीर, मेथी, पालक, शेपू यांसारख्या भाज्या २० रुपये प्रतिजुडी दराने विकल्या जात आहेत. कांदे पाच किलोसाठी सुमारे १०० रुपये, तर लसूण १०० ते १५० रुपये किलो आणि आले ६० ते ८० रुपये किलो दराने विक्री होत आहे.

फळभाज्यांच्या दरात गवार १२० ते १५० रुपये, शेवगा १२० ते १४० रुपये, मटार ८० ते १०० रुपये, टोमॅटो २५ ते ३० रुपये, भेंडी ६० ते ८० रुपये, फ्लॉवर ३० ते ४० रुपये, कोबी ३० रुपये, मिरची ८० ते १०० रुपये, गाजर ३० ते ५० रुपये, शिमला मिरची ७० ते ८० रुपये, काकडी ४० ते ५० रुपये, कारले ७० रुपये, बटाटा २५ ते ३० रुपये, बिन्स ६० ते ८० रुपये अशा दराने विक्री होत आहे. तसेच तोंडली, दोडका, घोसाळी, घेवडा यांसारख्या भाज्यांचे दर ६० ते ८० रुपयांच्या दरम्यान आहेत. दुधी भोपळा ५० ते ६० रुपये, बीट ४० ते ५० रुपये, लाल भोपळा ३० रुपये दराने उपलब्ध आहे. पालेभाज्यांमध्ये कोथिंबीर, मेथी, पालक, शेपू, राजगिरा, मुळा, चवळई, कांदापात या भाज्या २० रुपये प्रतिजुडी दराने विक्री होत असून, पुदिना १० रुपये आणि आळू पाने १० रुपये जुडी दराने उपलब्ध आहेत.

मटार आणि लिंबाच्या दरात वाढ झाली असली, तरी इतर बहुतांश भाजीपाल्यांचे दर स्थिर असल्याने ग्राहकांना काहीसा दिलासा मिळत आहे. तथापि, उन्हाळ्याचा प्रभाव वाढत गेल्यास भाजीपाल्याच्या दरात आणखी चढ-उतार होण्याची शक्यता वर्तवली जात आहे.

## १४३ कोटींची थकबाकी, जलसंपदा विभागाचा कडक इशारा

# पिंपरी-चिंचवड शहरासमोर पाणीपुरवठ्याचे संकट गडद

■ दैनिक राज्य लोकतंत्र



**पिंपरी:** ऐन उन्हाळ्याच्या तोंडावर पिंपरी-चिंचवड शहरासमोर पाणीपुरवठ्याचे गंभीर संकट उभे राहण्याची चिन्हे दिसू लागली आहेत. पवना धरणातून उचलल्या जाणाऱ्या पाण्याच्या पाणीपट्टीसह सांडपाणी प्रक्रिया न केल्याबद्दल आकारण्यात आलेल्या दंडाची एकूण १४३ कोटी रुपयांची थकबाकी तात्काळ भरण्याचे आदेश देत जलसंपदा विभागाने महापालिकेला पाणीपुरवठा खंडित करण्याचा स्पष्ट इशारा दिला आहे. या पार्श्वभूमीवर शहरातील पाणीव्यवस्थापनाचा प्रश्न पुन्हा एकदा ऐरणीवर आला आहे.

पिंपरी-चिंचवड शहराचा पाणीपुरवठा मोठ्या प्रमाणावर मावळ तालुक्यातील पवनानगर येथील पवना धरणावर अवलंबून आहे. रावेत बंधाऱ्यावरून दररोज सुमारे ५५० एमएलडी अशुद्ध पाणी उचलून ते निगडी-प्राधिकरणातील सेक्टर २३ येथील जलशुद्धीकरण केंद्रात प्रक्रिया करून शहरात वितरित केले जाते. औद्योगिक आणि नागरी वाढीमुळे पाण्याची मागणी सातत्याने वाढत असताना, उपलब्ध संसाधनांवर ताण येऊ लागल्याचे चित्र आहे.

दरम्यान, उन्हाळ्याची तीव्रता वाढू लागल्याने नागरिकांच्या तक्रारींमध्ये लक्षणीय वाढ झाली आहे. कमी दाबाने पाणी येणे, अपुरा पुरवठा, काही ठिकाणी अशुद्ध पाणी मिळणे अशा समस्या प्रकर्षाने समोर येत आहेत. महापालिकेच्या 'सारथी' हेल्पलाइनवर पाणीपुरवठ्याशी संबंधित तक्रारींचा भडिमार होत असल्याचे दिसून येत आहे.

पवना धरणातून महापालिकेला ५५० एमएलडी पाणी उचलण्याचा कोटा मंजूर आहे. या पाण्याच्या बदल्यात जलसंपदा विभागाकडून पाणीपट्टी आकारली जाते. मात्र, पाणीपट्टीची थकबाकी आणि सांडपाणी प्रक्रिया अपुरी ठेवल्यामुळे आकारण्यात आलेला दंड मिळून एकूण थकबाकी १४३ कोटी रुपयांवर पोहोचली आहे. ही रक्कम तातडीने भरली नाही, तर पाणीपुरवठा खंडित करण्याची कारवाई करण्यात येईल, असा इशारा संबंधित विभागाने दिला आहे.

महापालिकेच्या भूमिकेनुसार, पाणीपट्टी नियमित भरली जात असून अलीकडेच ८ कोटी ६ लाख रुपयांचा भरणा करण्यात आला आहे. मात्र, सांडपाणी प्रक्रिया पूर्ण क्षमतेने न झाल्यामुळे दंड आकारला जात असल्याचे मुख्य अभियंता प्रमोद ओंभासे यांनी स्पष्ट केले. यामुळे पाणीपुरवठ्याच्या आर्थिक आणि तांत्रिक व्यवस्थापनातील त्रुटी अधोरेखित होत आहेत.

जलसंपदा विभागाने आणखी एक गंभीर मुद्दा उपस्थित केला आहे तो म्हणजे मंजूर कोट्यापेक्षा अधिक पाण्याचा वापर. शहराची वाढती लोकसंख्या, औद्योगिक विस्तार आणि वाढती नागरीकरणाची गती यामुळे पाण्याची मागणी वाढत आहे. त्यामुळे मर्यादेपेक्षा जास्त पाणी उचलले जात असल्याचा आरोप विभागाने केला आहे.

सांडपाणी प्रक्रियेचा मुद्दा या वादाच्या केंद्रस्थानी आहे. शहरातील दहा सांडपाणी प्रक्रिया प्रकल्पांची एकूण क्षमता ३४५ एमएलडी इतकी असताना, प्रत्यक्षात केवळ २७५ एमएलडी सांडपाण्यावर प्रक्रिया केली जात असल्याचे समोर आले आहे. उर्वरित सांडपाणी प्रक्रिया न करता नदीपात्रात सोडले जात असल्याचा ठपका जलसंपदा विभागाने ठेवला आहे. पाणीपुरवठा खंडित होण्याची शक्यता ही केवळ प्रशासकीय वादापुरती मर्यादित नसून, त्याचा थेट परिणाम लाखो नागरिकांच्या दैनंदिन जीवनावर होऊ शकतो. त्यामुळे महापालिका आणि जलसंपदा विभागाने तातडीने संवाद साधून तोडगा काढणे अत्यावश्यक ठरते. अन्यथा, पिंपरी-चिंचवड शहराला ऐन उन्हाळ्यात गंभीर पाणीटंचाईचा सामना करावा लागू शकतो.

# ग्रीन सोसायटी उपक्रमाला वेग

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**पिंपरी :** पिंपरी-चिंचवड शहर अधिक स्वच्छ, हरित आणि शाश्वत करण्यासाठी महापालिकेने 'माझी वसुंधरा 6.0' अभियानांतर्गत 'ग्रीन सोसायटी' उपक्रमाला गती दिली आहे. या उपक्रमांतर्गत पर्यावरणपूरक प्रकल्प प्रभावीपणे राबविणाऱ्या गृहनिर्माण सोसायट्यांना १० ते १५ टक्क्यांपर्यंत मालमत्ता करात सवलत दिली जाणार आहे.

महापौर रवी लांडगे, उपमहापौर शर्मिला बाबर आणि आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी यांच्या मार्गदर्शनाखाली हा उपक्रम शहरभर राबविला जात आहे. अतिरिक्त आयुक्त विजयकुमार खोराटे, उपआयुक्त डॉ. प्रदीप ठेंगल आणि किरणकुमार मोरे यांचेही यात मार्गदर्शन लाभत आहे. .

या उपक्रमांतर्गत सोसायट्यांमध्ये कचरा व्यवस्थापन आणि कंपोस्टिंगद्वारे ओल्या कचऱ्याचे खतामध्ये रूपांतर केले जात आहे. तसेच रेन वॉटर हार्वेस्टिंगद्वारे पावसाचे पाणी साठवून त्याचा पुनर्वापर केला जातो. 'ग्रे वॉटर' प्रकल्पामुळे वापरलेल्या पाण्याचे पुनर्वापर होऊन पाणी बचत साधली जात आहे. याशिवाय सौर ऊर्जा प्रकल्पांद्वारे स्वच्छ आणि पर्यावरणपूरक ऊर्जेचा वापर वाढविण्यात येत आहे.

एकापेक्षा अधिक पर्यावरणपूरक उपक्रम राबविणाऱ्या सोसायट्यांना करसवलतीचा लाभ मिळत असून, यामुळे नागरिकांचा सहभाग वाढत आहे. 'ग' क्षेत्रीय कार्यालयांतर्गत क्षेत्रीय अधिकारी किशोर ननवरे यांच्या अधिपत्याखाली आरोग्य निरीक्षक स्नेहल सुकटे, आरोग्य सहाय्यक प्रशांत गोठे आणि प्रदीप सोनवणे हे या उपक्रमाची अंमलबजावणी करत आहेत.

**दैनिक राज्य लोकतंत्र** हे पत्र मुद्रक, प्रकाशक मालक सीमा भिमराव मस्के यांनी जगमित्र प्रिंटर्स ॲण्ड सेल्स कॉर्पोरेशन सुमतीनगर, जालना रोड, बीड येथे छापून कार्यालय दैनिक राज्य लोकतंत्र, राजीव गांधी चौक, कॅनाल रोड, बीड, ता.जि. बीड, ४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. **संपादक** - सीमा मस्के (मोकाशे) । **कार्यकारी संपादक** - सुभाष विलासराव चौरे या अंकात प्रकाशित झालेल्या मजकुरातील मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. न्यायालयीन वाद बीड न्यायकक्षेत. EMAIL- RAJYALOKTANTRA@GMAIL.COM NO.L SB/BEED RNP-206/2024-26

## सारांश वृत्त

### बेकायदेशीर वाळू वाहतुकीवर धडक कारवाई

**इंदापूर :** तालुक्यात बेकायदेशीर वाळू वाहतुकीवर पोलिसांनी कारवाई करत मोठा मुद्देमाल जप्त केला आहे. पुणे-सोलापूर महामार्गावरील हिंगणगाव परिसरात करण्यात आलेल्या या कारवाईत सुमारे ९४ लाख २४ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला असून वाळू तस्करांमध्ये खळबळ उडाली आहे. पोलिसांना या परिसरात बेकायदेशीर वाळू उत्खनन व वाहतूक सुरू असल्याची माहिती मिळाली होती. त्यानुसार सापळा रचून ही कारवाई करण्यात आली. यावेळी दोन टिपर वाहने आणि सुमारे चार ब्रास वाळू जप्त करण्यात आली. या प्रकरणी पाच जणांविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.


### लोणी काळभोर ग्रामसभेचा निर्णय

**लोणी काळभोर :** मुळा-मुठा नदीपात्रालगत वाढत चाललेल्या कचऱ्याच्या समस्येने गंभीर रूप धारण केल्यानंतर लोणी काळभोर ग्रामसभेत महत्त्वपूर्ण निर्णय घेण्यात आले. ग्रामपंचायत हद्दीतील गट क्रमांक ११३ मधील १८ एकर जागेवर अत्याधुनिक कचरा वर्गीकरण प्रकल्प उभारण्याचा ठराव ग्रामसभेत सर्वानुमते मंजूर करण्यात आला. शासकीय मोजणीनुसार नदीपात्र वगळून उर्वरित क्षेत्रावर कचरा व्यवस्थापन प्रकल्पासोबतच नदी सुधार प्रकल्प, उद्यान आणि ओपन जिम उभारण्यात येणार आहे. त्यामुळे परिसरातील पर्यावरणीय स्थिती सुधारण्यास मदत होणार असून नागरिकांना सुविधा उपलब्ध होणार आहेत. या निर्णयामुळे वाढत्या कचऱ्याच्या समस्येवर तोडगा निघण्याची अपेक्षा आहे.

## राजगुरुनगर येथे शहीद दिनानिमित्त अभिवादन

# शहीदांचे बलिदान प्रेरणेचा अखंड स्रोत

■ दैनिक राज्य लोकतंत्र



**राजगुरुनगर :** हुतात्मा राजगुरू, भगतसिंग आणि सुखदेव यांच्या अद्वितीय बलिदानामुळेच देशाला स्वातंत्र्य प्राप्त झाले. त्यांची राष्ट्रनिष्ठा, त्याग आणि अन्यायाविरुद्ध लढण्याची जिद्द आजही समाजाला प्रेरणा देणारी आहे. त्यांच्या कार्यातूनच पुढील पिढ्यांना राष्ट्रप्रेमाची दिशा मिळते, असे मत खेडचे आमदार बाबाजी काळे यांनी व्यक्त केले.

शहीद दिनाच्या ९५ व्या वर्धापनदिनानिमित्त राजगुरुनगर येथे विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. एसटी बस स्थानक परिसरातील हुतात्मा राजगुरू, भगतसिंग आणि सुखदेव यांच्या स्मृतीशिल्पाला अभिवादन करून कार्यक्रमाची सुरुवात झाली. यावेळी आमदार काळे यांनी उपस्थितांशी संवाद साधताना शहीदांच्या कार्याचे स्मरण करून दिले.

हुतात्मा शिवराम हरी राजगुरू स्मारकाचा विकास हा केवळ पायाभूत सुविधा उभारण्यापुरता मर्यादित नसून तो भावी पिढ्यांना प्रेरणेशी निगडित विषय असल्याचे त्यांनी नमूद केले. या स्मारकाच्या सर्वांगीण विकासासाठी आवश्यक निधीची मागणी विधानसभा अधिवेशनात मांडणार असल्याचेही त्यांनी स्पष्ट केले.

या कार्यक्रमास माजी आमदार दिलीप मोहिते पाटील, जिल्हा परिषद उपाध्यक्ष विवेक वळसे पाटील, बाजार समितीचे सभापती अ‍ॅड. विजयसिंह शिंदे पाटील, शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष अ‍ॅड. देवेंद्र बुट्टे पाटील, पंचायत समिती सभापती विद्याताई मोहिते यांच्यासह विविध पदाधिकारी आणि अधिकारी उपस्थित होते.

हुतात्मा राजगुरू महाविद्यालयात विवेक वळसे पाटील यांच्या हस्ते शासकीय स्मारकाला अभिवादन करण्यात आले. राष्ट्रीय सेवा योजनेचे विद्यार्थी तसेच विविध शाळांतील विद्यार्थ्यांनी मानवंदना दिली. तसेच राजगुरु यांच्या जन्मस्थळी पोलीस निरीक्षक सुभाष चव्हाण यांच्या हस्ते ध्वजारोहण पार पडले. नगरपरिषदेमार्फत तीन दिवस विविध उपक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. यात मॅरेथॉन स्पर्धा, रक्तदान शिबिर आणि व्याख्यानांचा समावेश होता. या उपक्रमांना नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाल्याची माहिती मुख्याधिकारी अंबादास गरकळ यांनी दिली.

राजगुरुनगर सहकारी बँकेत अध्यक्ष सागर पाटोळे यांच्या हस्ते हुतात्मा राजगुरू तसेच संस्थापक अध्यक्ष स्व. परशुराम आपटे यांच्या पुतळ्याला पुष्पहार अर्पण करण्यात आला. शहरातील शाळा, महाविद्यालये, बाजार समिती आणि पंचायत समितीमध्येही शहीद दिनानिमित्त अभिवादन कार्यक्रम पार पडले.

## जिल्हा बँकेच्या आंबेगाव विभागाचा आढावा; ठेवी-कर्ज उद्दिष्टे पूर्ण करा

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**मंचर :** पुणे जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या आंबेगाव विभागातील कामकाजाचा सविस्तर आढावा घेण्यासाठी मंचर येथे महत्त्वपूर्ण बैठक पार पडली. सन २०२५-२६ या आर्थिक वर्षासाठी आदर्श ताळेबंद उभारण्याच्या दृष्टीने मुख्य कार्यालयाने दिलेल्या उद्दिष्टांच्या पूर्ततेचा आढावा माजी सहकार मंत्री दिलीप वळसे पाटील यांनी घेतला.


बैठकीत बँकेची आर्थिक स्थिती अधिक सक्षम करण्यावर भर देण्यात आला. आंबेगाव विभागातील सर्व १८ शाखांना मार्चअखेरपर्यंत ठेवी व कर्जवाटपाची उद्दिष्टे पूर्ण करण्याच्या स्पष्ट सूचना देण्यात आल्या. बँकेचा 'सीडी रेशो' संतुलित राखण्यासाठी ठेवींच्या ६५ ते ७० टक्क्यांपर्यंत शेती व बिगरशेती कर्जवाटप वाढविण्याबाबत मार्गदर्शन करण्यात आले.

शाखांमध्ये वाढत असलेल्या 'एनपीए' अर्थात थकीत कर्जाच्या प्रमाणावर नियंत्रण मिळवण्यासाठी युद्धपातळीवर प्रयत्न करण्याचे निर्देश देण्यात आले. शासनाच्या पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमाफी योजनेअंतर्गत थकीत कर्जदारांची माहिती ऑनलाइन पोर्टलवर अपलोड करण्याच्या कामाचाही आढावा घेण्यात आला.

भविष्यातील आर्थिक आव्हानांचा सामना करण्यासाठी बँकेचा ताळेबंद अधिक सक्षम करण्यासाठी सर्व अधिकारी व कर्मचाऱ्यांनी समन्वयाने काम करावे, असे आवाहन दिलीप वळसे पाटील यांनी केले. बैठकीस जिल्हा बँकेचे अध्यक्ष डॉ. दिगंबर दुर्गाडे, संचालक संजय काळे, आमदार बापूसाहेब पठारे, जिल्हा परिषद सदस्य विष्णुकाका हिंगे, मुख्य कार्यकारी अधिकारी अनिरुद्ध देसाई, सरव्यवस्थापक संजय शितोळे, उपसरव्यवस्थापक अंकुश हिंगे, झोनल ऑफिसर विष्णू गायकवाड यांच्यासह आंबेगाव विभागातील सर्व १८ शाखांचे शाखाप्रमुख व कर्मचारी उपस्थित होते.

## मंचरजवळ अपघात; एकाच कुटुंबातील तिघांचा मृत्यू

■ दैनिक राज्य लोकतंत्र



**मंचर :** पुणे-नाशिक महामार्गावर मंचरजवळील एकलहरे गावाच्या हद्दीत रविवारी उशिरा रात्री झालेल्या भीषण अपघातात एकाच कुटुंबातील तिघांचा जागीच मृत्यू झाला, तर दोन मुले गंभीर जखमी झाली. या घटनेमुळे परिसरात हळहळ व्यक्त होत आहे.

मंचर पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, मल्लिकार्जुन शिवराम आंबेगावे (रा. पिंपरी, पुणे) हे कुटुंबासह नाशिककडून पुण्याकडे चारचाकी वाहनाने येत होते. रात्री साडेअकराच्या सुमारास एकलहरेजवळ त्यांच्या कारचा ताबा सुटला. वाहनाने महामार्गावरील डिव्हायडर तोडत समोरून येणाऱ्या बसला जोरदार धडक दिली. या अपघातात चालक मल्लिकार्जुन शिवराम आंबेगावे (वय ४६), त्यांची पत्नी आरती आंबेगावे (वय ४२) आणि सासू लता बाळू तूपलोंढे (वय ६३) यांचा जागीच मृत्यू झाला. तर मुलगा प्रेम आंबेगावे (वय २०) आणि मुलगी मृणाल आंबेगावे (वय १६) हे गंभीर जखमी झाले असून त्यांच्यावर मंचर येथील खासगी रुग्णालयात उपचार सुरू आहेत.

अपघाताची तीव्रता इतकी होती की कारचा अक्षरशः चक्काचूर झाला. दोन्ही टायर फुटल्याचेही समोर आले असून बसच्या पुढील भागाचे नुकसान झाले आहे. अपघाताचे नेमके कारण अद्याप स्पष्ट झाले नसले तरी मागून येणाऱ्या वाहनाने धडक दिल्याने किंवा टायर फुटल्याने वाहनावरील नियंत्रण सुटल्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. घटनेची माहिती मिळताच मंचर पोलिसांनी तातडीने घटनास्थळी धाव घेत पंचनामा केला. जखमींना तत्काळ रुग्णालयात हलविण्यात आले.

अपघातानंतर काचमधून धूर येत असल्याने स्थानिकांनी बंदरीच्या वायर वेगळ्या करून संभाव्य धोका टाळला आणि रुग्णवाहिकेला संपर्क साधून मदत मिळवून दिली. अपघातामुळे काही काळ महामार्गावरील वाहतूक विस्कळीत झाली होती. मृतदेहांचे शवविच्छेदन करून ते नातेवाईकांच्या ताब्यात देण्यात आले असून, अपघाताच्या नेमक्या कारणांचा पोलिसांकडून पुढील तपास सुरू आहे.

## कांदा काढणीसोबत बराकी उभारणीला वेग; कमी दरामुळे शेतकरी बांधव चिंतेत

■ दैनिक राज्य लोकतंत्र



**पारगाव :** आंबेगाव तालुक्याच्या पूर्व भागात रब्बी हंगामातील कांदा काढणीला वेग आला असून साठवणुकीसाठी कांदा बराकी आणि चाळी उभारण्याची कामे जोरात सुरू आहेत. मात्र, बाजारात मिळणारा कांद्याचा दर समाधानकारक नसल्याने शेतकरी सध्या संभ्रमात आहेत.

कांदा पिकासाठी झालेला खर्च लक्षात घेता सध्याचे दर अपुरे ठरत आहेत. त्यामुळे अनेक शेतकरी तातडीने विक्री न करता कांदा बराकीत साठवून ठेवत आहेत. भविष्यात दर वाढतील, या अपेक्षेवर काही शेतकरी महिनोनमहिने कांदा साठवून योग्य वेळी टप्प्याटप्प्याने विक्री करण्याचा पर्याय निवडत आहेत. तथापि, बदलत्या हवामानाचा कांदा साठवणुकीवर परिणाम होत आहे. वाढलेली उष्णता, आर्द्रता आणि अवकाळी पावसामुळे साठवलेला कांदा खराब होण्याचा धोका वाढतो. त्यामुळे शेतकऱ्यांना अपेक्षित नफा मिळण्यात अडचणी येत आहेत. योग्य साठवणूक पद्धती, हवेशीर चाळी आणि बाजारभावाचा अचूक अंदाज यांचा समन्वय साधणे शेतकऱ्यांसाठी अत्यावश्यक ठरले आहे.

पारगाव, शिंगवे, रांजणी, वळती, नागापूर, थोरांदळे या गावांमध्ये मोठ्या प्रमाणावर कांदा बराकी उभारणी सुरू आहे. बराकी उभारण्यासाठी लोखंडाचा मोठ्या प्रमाणावर वापर होत असून, लोखंडाच्या वाढत्या किमतीमुळे खर्चातही वाढ झाली आहे. सध्या लोखंडाचा दर किलोमागे ६० ते ६५ रुपयांच्या दरम्यान आहे. दोन पाखी बराकीसाठी सुमारे १,२०० रुपये, तर एक पाखी बराकीसाठी ६०० रुपये आकारले जात आहेत. साधारणपणे एक एकर कांदा साठवण्यासाठी ५० ते ६० फूट लांबीची बराकी आवश्यक असते. यासाठी दीड ते दोन लाख रुपयांपर्यंत खर्च येत असल्याची माहिती व्यावसायिक मंगेश धनगरमाळी यांनी दिली.

## वळती-रांजणी रस्त्याची दयनीय अवस्था



■ दैनिक राज्य लोकतंत्र

**पारगाव :** आंबेगाव तालुक्यातील वळती ते रांजणी हा महत्त्वाचा ग्रामीण रस्ता सध्या अत्यंत खराब अवस्थेत असून सार्वजनिक बांधकाम विभागाकडून दुर्लक्ष होत असल्याबद्दल तीव्र नाराजी नागरिकांमध्ये व्यक्त होत आहे. रस्त्यावर ठिकठिकाणी पडलेल्या मोठ्या खड्ड्यांमुळे वाहनचालकांना जीव धोक्यात घालून प्रवास करावा लागत आहे.

या मार्गावरून दररोज शेकडो नागरिक, शेतकरी आणि विद्यार्थ्यांची ये-जा सुरू असते. वळती, रांजणी तसेच आसपासच्या गावांसाठी हा प्रमुख संपर्क मार्ग मानला जातो. मात्र, रस्त्याची दुरवस्था दिवसेंदिवस वाढत असल्याने नागरिकांना मोठा त्रास सहन करावा लागत आहे.

विशेषतः दुचाकीस्वारांना या रस्त्यावरून जाताना संतुलन राखणे अवघड होत असून, किरकोळ अपघातांच्या घटना वाढल्या आहेत. अनेक ठिकाणी खड्ड्यांची खोली लक्षात येत नसल्याने वाहनचालक अचानक अडचणीत सापडत आहेत. काही भागांत डांबर पूर्णतः निघून गेल्याने खडी बाहेर आली आहे, त्यामुळे रस्ता अधिकच धोकादायक बनला आहे.

स्थानिक नागरिकांच्या म्हणण्यानुसार, गेल्या काही महिन्यांपासून रस्त्याची स्थिती अधिक बिकट झाली असून, दुरुस्तीबाबत वारंवार मागणी करूनही ठोस कार्यवाही झालेली नाही. नागरिकांच्या सुरक्षिततेच्या दृष्टीने या रस्त्याची तातडीने दुरुस्ती करून खड्डे बुजविण्याची मागणी होत आहे. अन्यथा मोठ्या अपघाताची शक्यता नाकारता येत नाही, अशी भीती व्यक्त केली जात आहे.

## ऐन परीक्षेच्या दरम्यान इंदापूरात लोडशेडिंग

**भवानीनगर :** इंदापूर तालुक्याच्या पश्चिम भागात ऐन परीक्षेच्या काळात महावितरणकडून सुरू करण्यात आलेल्या विजेच्या लोडशेडिंगमुळे विद्यार्थी व पालकांमध्ये संतापाचे वातावरण निर्माण झाले आहे. सणसर, भवानीनगर व परिसरात दररोज संध्याकाळी तीन ते चार तास वीजपुरवठा खंडित केला जात असल्याने विद्यार्थ्यांच्या अभ्यासावर मोठा परिणाम होत आहे. विद्यार्थी अभ्यासावर भर देत आहेत. मात्र, याच काळात वीज खंडित होत असल्याने त्यांना अडचणींचा सामना करावा लागत आहे. उन्हाळ्याची तीव्रता वाढत असताना डासांचे प्रमाणही वाढले असून, अंधारात आणि उकाड्यात अभ्यास करणे विद्यार्थ्यांसाठी कठीण झाले आहे. उन्हाळ्याची सुरुवात होताच लोडशेडिंग सुरू झाल्याने ग्रामस्थांमध्ये तीव्र असंतोष निर्माण झाला आहे.

## ३६ वर्षांनंतर अण्णासाहेब आवटे कॉलेजमध्ये माजी विद्यार्थ्यांचा स्नेहमेळावा

■ दैनिक राज्य लोकतंत्र




**लोणी-धामणी :** मंचर (ता. आंबेगाव) येथील अण्णासाहेब आवटे कॉलेजमध्ये तब्बल ३६ वर्षांनंतर माजी विद्यार्थ्यांचा स्नेहमेळावा उत्साहात पार पडला. अनेक वर्षांनी पुन्हा एकत्र आलेल्या विद्यार्थ्यांनी जुन्या आठवणींना उजाळा देत भावनिक वातावरण निर्माण झाले.

कार्यक्रमाची सुरुवात रयत शिक्षण संस्थेचे संस्थापक कर्मवीर भाऊराव पाटील यांच्या प्रतिमेच्या पूजनाने व प्रार्थनेने झाली. त्यानंतर राष्ट्रगीत व प्रतिज्ञा घेण्यात आली. दीपप्रज्वलन करून सरस्वती पूजन करण्यात आले आणि उपस्थितांनी एकमेकांचे टाळ्यांच्या गजरात स्वागत केले.

या वेळी बी.ए. वर्गाला अध्यापन करणारे माजी प्राचार्य आय. बी. जाधव यांचा सत्कार करण्यात आला. अनेक माजी विद्यार्थ्यांनी आपल्या मनोगतातून कॉलेज जीवनातील आठवणींना उजाळा दिला. त्या आठवणी सांगताना अनेकांच्या डोळ्यांत नकळत पाणी तरळल्याचे दिसून आले.

या माजी विद्यार्थ्यांनी विविध क्षेत्रांत यश संपादन केले आहे. काही जण भारतीय लष्करात दाखल झाले, काही शिक्षक, अधिकारी झाले, तर काहींनी कॉर्पोरेट क्षेत्रात तर काहींनी शेतीत आपली ओळख निर्माण केली. आपल्या यशामध्ये शिक्षकांचा मोठा वाटा असल्याचे सर्वांनी नमूद केले. सर्वांना एकत्र आणण्याचे काम देवीदास हुले, कांताराम भोंडवे, कांताराम टाव्हरे, सुमन फलके आणि संजना टाकळकर यांनी केले. यावेळी माजी विद्यार्थ्यांनी कॉलेजला दोन हजार रुपये किमतीचे 'ज्ञानेश्वरांचे पसायदान' फ्रेम स्वरूपात भेट दिली.

माजी प्राचार्य आय. बी. जाधव यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. कार्यक्रमास प्रा. राहुल गावडे व प्रभारी प्राचार्य उपस्थित होते. प्रास्ताविक राजू आढळराव यांनी केले, सूत्रसंचालन प्रा. अरुण गोरडे यांनी केले, तर आभार निलेश सैद यांनी मानले.

कार्यक्रमानंतर गोड भोजनाचा आस्वाद घेत सर्वांनी एकमेकांचा निरोप घेतला. पुन्हा भेटण्याचे आश्वासन देताना अनेकांचे डोळे पाणावले होते.

## ६,६२२ हेक्टर क्षेत्र सिंचनाखाली येणार

# कळमोडी प्रकल्पाच्या फेरनियोजनाला मंजुरी : दिलीप वळसे पाटील

■ दैनिक राज्य लोकतंत्र



**मंचर :** खेड आणि आंबेगाव तालुक्यातील शेतकऱ्यांसाठी दिलासा देणारा महत्त्वाचा निर्णय राज्य शासनाने घेतला आहे. कळमोडी (आरळा) मध्यम प्रकल्पाच्या पाणीवापराच्या फेरनियोजनास मंजुरी देण्यात आल्याने एकूण ६,६२२ हेक्टर क्षेत्र सिंचनाखाली येणार असून, अवर्षणप्रवण भागातील शेतीला मोठा आधार मिळणार आहे. माजी गृहमंत्री दिलीप वळसे पाटील यांनी ही माहिती दिली.

महाराष्ट्र कृष्णा खोरे विकास महामंडळांतर्गत राबविण्यात येणाऱ्या या प्रकल्पामुळे आंबेगाव तालुक्यातील सातगाव पठार आणि खेड तालुक्यातील वाफगाव परिसरातील पाण्याअभावी त्रस्त असलेल्या शेतकऱ्यांना मोठा लाभ होणार आहे. कळमोडी येथे भीमा नदीच्या आरळा उपनदीवर उभारण्यात आलेल्या धरणात २०१० पासून पूर्ण क्षमतेने पाणीसाठा होत असून, प्रकल्पाची एकूण साठवण क्षमता ४२.८७ दलघमी आहे. त्यापैकी ४२.६७ दलघमी पाणी उपयुक्त असल्याचे सांगण्यात आले.

मूळ आराखड्यानुसार सातगाव पठार उपसा सिंचन योजनेद्वारे ५,०६५ हेक्टर क्षेत्र सिंचनाखाली आणण्याचे उद्दिष्ट होते. मात्र, शासनाच्या आठमाही पाणीपुरवठा धोरणानुसार उन्हाळी हंगामासाठी राखीव पाण्याचा पुनर्विचार करून फेरनियोजन करण्यात आले. यामुळे ४.५८५ दलघमी अतिरिक्त पाणी उपलब्ध झाले आहे. या अतिरिक्त पाण्यामुळे भीमाशंकर आदिवासी उपसा सिंचन योजनेअंतर्गत एकलहरे व कुडे गावांतील ३०५ हेक्टर क्षेत्र तसेच वाफगाव, वरुडे, पूर आणि कन्हेरसर गावांतील १,२५२ हेक्टर क्षेत्र सिंचनाखाली येणार आहे. परिणामी, एकूण सिंचन क्षेत्रात १,५५७ हेक्टरची वाढ होणार आहे.

शासनाच्या २६ फेब्रुवारी २०२६ च्या निर्णयानुसार या फेरनियोजनामुळे सिंचन क्षेत्रात १० टक्क्यांपेक्षा अधिक वाढ होत आहे. मात्र, प्रशासकीय आराखड्यानुसार सातगाव पठार उपसा सिंचन योजना दोन टप्प्यांत राबविण्यात येणार आहे. पहिल्या टप्प्यात बंदिस्त नलिका वितरण प्रणालीद्वारे खेड तालुक्यातील १,६२५ हेक्टर क्षेत्र सिंचनाखाली येईल. दुसऱ्या टप्प्यात वेळनदीत पाणी सोडून बंधाऱ्यांच्या माध्यमातून आंबेगाव तालुक्यातील ३,४४० हेक्टर क्षेत्रास लाभ मिळणार आहे.

खेड तालुक्यातील अवर्षणप्रवण आणि आदिवासी भागातील शेतीला पाणीपुरवठा करण्यासाठी तसेच पूर्व भागातील बंधाऱ्यांना पाणी उपलब्ध करून देण्यासाठी या प्रकल्पाच्या फेर जलनियोजनास मंजुरी देण्यात आली आहे. त्यामुळे परिसरातील शेतकऱ्यांच्या पाण्याच्या प्रश्नावर मोठ्या प्रमाणात दिलासा मिळणार असल्याचे मत व्यक्त होत आहे.

या प्रकल्पामुळे सातगाव पठार आणि वाफगाव परिसरासह दुर्गम भागातील शेतजमीन सिंचनाखाली येणार असल्याने शेतकऱ्यांचे उत्पन्न वाढेल. स्थलांतराचे प्रमाणही कमी होईल. शासनाचा हा निर्णय योग्य दिशेने टाकलेले पाऊल आहे, असे संजय पवळे, पंचायत समिती सदस्य यांनी म्हटले आहे.

तसेच, कळमोडी प्रकल्पाच्या फेरनियोजनामुळे सिंचन क्षेत्रात वाढ होऊन शेतकऱ्यांच्या उत्पादनक्षमतात वाढेल. परिणामी कृषी उत्पन्न बाजार समित्यांमध्ये येणाऱ्या मालाच्या आवकेतही वाढ होईल, असे सचिन पानसरे, उपसभापती, कृषी उत्पन्न बाजार समिती, मंचर यांनी म्हटले आहे.

## ईपीएफओ योजनेसाठी ऑफलाइन अर्ज ग्राह्य धरा

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**लोणी-धामणी :** कर्मचारी भविष्य निर्वाह निधी संघटनेच्या १९९५ च्या उच्च पेन्शन योजनेसाठी २०२३ मध्ये सादर केलेले ऑफलाइन संयुक्त दावा अर्ज ग्राह्य धरावेत किंवा अर्ज प्रक्रियेसाठी अधिकृत यूएएन पोर्टल उपलब्ध करून द्यावे, अशी मागणी खाजगी क्षेत्रातील निवृत्तीधारकांनी केली आहे. याबाबत अप्पर केंद्रीय आयुक्त अमित वशिष्ट यांना लेखी निवेदन सादर करण्यात आले.

निवेदनात नमूद करण्यात आले आहे की, अनेक पेन्शनधारकांनी २०२३ मध्ये नियमानुसार शंकरशेठ रोड (गोळीबार मैदानाजवळ) येथील ईपीएफओ कार्यालयात प्रत्यक्ष उपस्थित राहून संयुक्त दावा अर्ज जमा केले होते. मात्र सध्या ऑनलाइन प्रणालीअभावी किंवा यूएएन क्रमांक उपलब्ध नसल्यामुळे या अर्जांचा विचार होत नसल्याची तक्रार करण्यात आली आहे. त्यामुळे संबंधित ऑफलाइन अर्ज ग्राह्य धरून त्या पेन्शनधारकांना उच्च पेन्शन योजनेत समाविष्ट करावे, अशी मागणी करण्यात आली आहे. तसेच, ज्यांच्याकडे यूएएन क्रमांक उपलब्ध नाही, अशांसाठी ईपीएफओने अधिकृत पोर्टल उपलब्ध करून द्यावे, अशीही मागणी निवेदनात करण्यात आली आहे.

उच्च पेन्शन योजना ही निवृत्तीधारकांसाठी महत्त्वाची सामाजिक सुरक्षा योजना असून ती त्यांच्या दैनंदिन गरजा आणि आरोग्याशी संबंधित असल्याचे निवेदनात नमूद करण्यात आले आहे. त्यामुळे या प्रकरणात सहानुभूतिपूर्वक आणि तातडीने निर्णय घेण्याची अपेक्षा व्यक्त करण्यात आली आहे. या मागणीसंदर्भात केंद्रीय मंत्री, मुख्यमंत्री आणि खासदारांकडेही निवेदनाद्वारे पाठपुरावा करण्यात आल्याची माहिती निवृत्तीधारकांच्या वतीने देण्यात आली आहे.

## सारांश वृत्त

### तामिळनाडूत द्रमुक आघाडी जिंकणार



**चेन्नई :** तामिळनाडूत होणाऱ्या विधानसभा निवडणुकीत सत्ताधारी द्रमुक आघाडीला २३४ पैकी १८० जागा मिळतील, असा अंदाज वर्तवण्यात आला आहे. अग्री न्यूज सर्व्हिसचे मुख्य कार्यकारी अधिकारी आर. सुरेश कुमार यांनी सांगितले की, द्रमुक आघाडीला ४४.९ टक्के मते मिळण्याची शक्यता आहे. विरोधी अण्णाद्रमुक आघाडीला ३८.५ टक्के मतांसह ५४ जागा मिळतील असा अंदाज आहे.

### बिहारमध्ये दोन दुचाकीस्वारांचा मृत्यू




**गयाजी :** बिहारच्या गयाजी जिल्ह्यात सोमवारी मोटारसायकलींची समोरासमोर धडक होऊन दोन तरुणांचा मृत्यू झाला. चंदौती पोलिस ठाण्याच्या हद्दीतील केवली गावात सकाळी ७.३० च्या सुमारास हा अपघात झाला. अक्षय कुमार उर्फ कारू (वय २२, रा. धरमपूर) आणि सुभाष कुमार (वय २५, रा. बेलमा) अशी मृतांची नावे आहेत.

### ज्येष्ठ पत्रकार एस. त्यागराजन यांचे निधन



**चेन्नई :** हॉकीचे वार्तांकन करून स्वत:ची ओळख निर्माण करणारे ज्येष्ठ क्रीडा पत्रकार एस. त्यागराजन यांचे सोमवारी (सोमवारी) वयोवृद्ध आजारांमुळे निधन झाले. ते ८५ वर्षांचे होते. त्यांच्या पश्चात पत्नी आणि दोन मुली असा परिवार आहे. सोमवारी चेन्नई येथे त्यांच्यावर अंत्यसंस्कार करण्यात आले.

## पंतप्रधान मोदी यांचे संसदेत निवेदन

# संघर्षामुळे भारतासमोर ‘अभूतपूर्व’ आव्हाने

■ दैनिक राज्य लोकतंत्र



**नवी दिल्ली :** पश्चिम आशियात सुरू असलेला संघर्ष चिंताजनक असून त्याचे भारतावर बहुआयामी परिणाम होत असल्याचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी सोमवारी संसदेत स्पष्ट केले. या संकटामुळे देशासमोर आर्थिक, राष्ट्रीय सुरक्षा आणि मानवतावादी अशी ‘अभूतपूर्व’ आव्हाने उभी राहिल्याचे त्यांनी नमूद केले.

संघर्षाला तीन आठवड्यांहून अधिक काळ लोटला असून त्याचा जागतिक अर्थव्यवस्था आणि सर्वसामान्यांच्या जीवनावर गंभीर परिणाम होत आहे. त्यामुळे या तणावावर लवकरात लवकर तोडगा काढण्याचे आवाहन भारताने सर्व पक्षांना केले असल्याचे मोदी म्हणाले. ऊर्जा सुरक्षेचा मुद्दा अधोरेखित करताना त्यांनी सांगितले की, भारत आपल्या एलपीजी गरजेपैकी सुमारे ६० टक्के आयात करतो. पुरवठ्यातील अनिश्चितता लक्षात घेऊन घरगुती ग्राहकांना प्राधान्य देण्यात येत असून पेट्रोल, डिझेल आणि गॅसचा पुरवठा सुरळीत ठेवण्यासाठी सरकारकडून सातत्याने प्रयत्न सुरू आहेत.

होर्मुझच्या सामुद्रधुनीतून जहाजांची हालचाल युद्धामुळे आव्हानात्मक झाली असली, तरी इंधन पुरवठ्यावर कमीतकमी परिणाम होईल यासाठी उपाययोजना करण्यात येत असल्याचे त्यांनी सांगितले. भारताने ऊर्जा आयात स्रोतांची विविधता वाढवत आता ४१ देशांकडून आयात सुरू केली असून पेट्रोलियम साठा वाढवण्याचाही निर्णय घेतला आहे.

पश्चिम आशिया हा भारतासाठी महत्त्वाचा व्यापार मार्ग असून मोठ्या प्रमाणात कच्चे तेल आणि वायू याच प्रदेशातून येतो. याशिवाय आखाती देशांमध्ये सुमारे एक कोटी भारतीय वास्तव्यास असल्याने भारताची चिंता अधिक वाढल्याचे पंतप्रधानांनी सांगितले. संघर्षाच्या पार्श्वभूमीवर भारतीयांच्या सुरक्षेला सर्वोच्च प्राधान्य देण्यात आले आहे. युद्ध सुरू झाल्यापासून सुमारे ३.७५ लाख भारतीयांना सुखरूप मायदेशी परत आणण्यात आले असून इराणमधून सुमारे १,००० नागरिकांना बाहेर काढण्यात आले आहे. प्रभावित भागातील भारतीय दूतावास सतत मदत करत असल्याचेही त्यांनी नमूद केले.

दरम्यान, होर्मुझ सामुद्रधुनीतील व्यत्यय आणि व्यावसायिक जहाजांवरील हल्ल्यांचा निषेध करत भारताने अशा कृतींना ‘अस्वीकार्य’ ठरवले आहे. संवाद आणि मुत्सद्देगिरी हाच या संघर्षावर उपाय असल्याचे सांगत भारताने सर्व बाजूंना शांततेचे आवाहन केले आहे. मानवी जीवनाचे संरक्षण हे सर्वोच्च असल्याचे अधोरेखित करत मोदी यांनी या संघर्षात मृत्यू झालेल्या नागरिकांबद्दल शोक व्यक्त केला तसेच पीडित कुटुंबांना मदत करण्यात येत असल्याची माहिती दिली.

## मोदींच्या वक्तव्यात नवे काही नाही : प्रियंका गांधी




■ दैनिक राज्य लोकतंत्र

**नवी दिल्ली :** पश्चिम आशियातील परिस्थितीवर पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी लोकसभेत केलेल्या वक्तव्यात कोणतीही नवी माहिती नव्हती, अशी टीका काँग्रेस नेत्या प्रियंका गांधी वाड्रा यांनी सोमवारी केली. या विषयावर संसदेत सविस्तर चर्चा व्हावी, अशी मागणीही त्यांनी केली.

पंतप्रधान मोदी यांनी आपल्या निवेदनात पश्चिम आशियातील परिस्थिती चिंताजनक असल्याचे सांगत भारतीयांच्या सुरक्षेला सर्वोच्च प्राधान्य असल्याचे स्पष्ट केले होते.

तसेच जागतिक अर्थव्यवस्था, ऊर्जा पुरवठा आणि सर्वसामान्यांच्या जीवनावर या संघर्षाचा परिणाम होत असल्याचे त्यांनी नमूद केले.

या पार्श्वभूमीवर प्रतिक्रिया देताना प्रियांका गांधी म्हणाल्या, “पंतप्रधानांनी परिस्थितीची माहिती दिली, मात्र त्यात काहीही नवे नव्हते.” काँग्रेसने या विषयावर चर्चेसाठी नोटीस दिली असून सर्व पक्षांना आपली भूमिका मांडण्याची संधी मिळावी, असे त्यांनी सांगितले.

दरम्यान, पंतप्रधान मोदी यांनी होर्मुझच्या सामुद्रधुनीतून होणाऱ्या मालवाहतुकीतील अडचणींचा उल्लेख करत इंधन पुरवठ्यावर परिणाम होऊ नये यासाठी सरकार प्रयत्नशील असल्याचे स्पष्ट केले होते.

## फेरीवाल्यांची ओळख पडताळा

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**मुंबई :** महानगरातील अनधिकृत फेरीवाल्यांमुळे वाढलेल्या अडचणींची दखल घेत मुंबई उच्च न्यायालयाने महापालिका आणि पोलिसांना महत्त्वाचे निर्देश दिले आहेत. शहरातील सर्व फेरीवाले आणि त्यांच्या मदतनीसांची ओळख तपासून घ्यावी, तसेच बेकायदा स्थलांतरित आढळल्यास त्यांच्यावर कायदेशीर कारवाई करावी, असे आदेश न्यायालयाने दिले.

न्यायमूर्ती ए. एस. गडकरी आणि न्यायमूर्ती कमल खाटा यांच्या खंडपीठासमोर पदपथ आणि रस्त्यांवरील अनधिकृत फेरीवाल्यांमुळे पादचारी व वाहनचालकांना होणाऱ्या त्रासाबाबत याचिका दाखल करण्यात आली होती. त्यावर सुनावणी करताना न्यायालयाने ही भूमिका स्पष्ट केली. महापालिकेला शहरातील सर्व तात्पुरत्या व कायमस्वरूपी स्टॉलधारकांची सखोल तपासणी आणि छाननी करण्याचे आदेश देण्यात आले आहेत. या स्टॉलमुळे पादचारी किंवा वाहतुकीत अडथळा निर्माण होत आहे का, याची खातरजमा करण्यासही सांगण्यात आले आहे. फेरीवाले तसेच त्यांचे सहाय्यक म्हणून काम करणाऱ्यांची ओळख पडताळून पाहावी. त्यामध्ये बांगलादेशी किंवा इतर परदेशी नागरिक असल्यास त्यांची नोंद घ्यावी, असे न्यायालयाने स्पष्ट केले. कोणी बेकायदेशीर स्थलांतरित असल्याचे आढळले, तर त्यांच्यावर कायद्यानुसार कारवाई करून संबंधित अधिकाऱ्यांमार्फत त्यांना मायदेशी पाठवण्याची प्रक्रिया राबवावी, असेही निर्देश देण्यात आले.

न्यायालयाने नमूद केले की, सुमारे ९९ हजार फेरीवाले पात्र ठरले आहेत. या पात्र फेरीवाल्यांनाच मार्गदर्शक तत्त्वांचे काटेकोर पालन करून व्यवसाय करण्याची परवानगी द्यावी. इतर अनधिकृत फेरीवाल्यांना तात्काळ हटवण्याचे आदेश देण्यात आले आहेत.

## काश्मीरकडून इराणला मदतीचा हात

■ दैनिक राज्य लोकतंत्र



**नवी दिल्ली :** भारतातील इराणच्या दूतावासाने काश्मीरमधून मिळालेल्या मानवतावादी मदतीबद्दल कृतज्ञता व्यक्त करत ‘थँक यू, भारत’ अशी पोस्ट सोशल मीडियावर शेअर केली आहे. या पोस्टमध्ये काश्मिरी नागरिकांनी, विशेषतः लहान मुलांनी इराणसाठी दिलेल्या देणग्यांचे व्हिडिओही दाखवण्यात आले आहेत.

दूतावासाने आपल्या संदेशात म्हटले आहे की, “कृतज्ञतेने भरलेल्या अंतःकरणाने आम्ही काश्मीरच्या लोकांचे मनापासून आभार मानतो. त्यांनी मानवतावादी आधार आणि एकजुटीने इराणच्या लोकांसोबत उभे राहून मदत केली.” तसेच “ही दयाळूपणा कधीही विसरली जाणार नाही,” असेही पोस्टमध्ये नमूद करण्यात आले आहे. पोस्टमध्ये शेअर करण्यात आलेल्या व्हिडिओंमध्ये काही लहान मुले आपले पिगी बँक देणगी म्हणून देताना दिसत आहेत. “काश्मिरी मुलेही इराणसाठी आपली बचत देत आहेत,” असे कॅप्शन या व्हिडिओंना देण्यात आले आहे.

या पोस्टवर सोशल मीडियावर विविध प्रतिक्रिया उमटल्या आहेत. काहींनी या उपक्रमाचे स्वागत केले, तर काहींनी इराणसारख्या संसाधनसमृद्ध देशाने भारतातून देणग्या स्वीकारण्यावर प्रश्नचिन्ह उपस्थित केले. पश्चिम आशियातील वाढत्या संघर्षाच्या पार्श्वभूमीवर ही मदत आणि त्यावर आलेल्या प्रतिक्रिया लक्षवेधी ठरत आहेत.

दरम्यान, इराणचे सर्वोच्च नेते अयातुल्ला अली खामेनी यांच्या निधनानंतर भारतातील काही भागांत शोक व्यक्त करण्यात आला. तसेच पश्चिम आशियातील संघर्षामुळे भारतासमोर कूटनीतिक आणि मानवीय आव्हाने निर्माण झाल्याचेही स्पष्ट होत आहे. अमेरिका-इस्रायल आणि इराण यांच्यातील संघर्ष तीव्र होत असताना भारताने अद्याप काही बाबींवर अधिकृत भूमिका स्पष्ट केलेली नसली, तरी प्रादेशिक स्थैर्य आणि शांततेसाठी संवादाची गरज अधोरेखित केली जात आहे.

## तणावाने सेन्सेक्स १,८३७ अंकांनी कोसळला

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**मुंबई :** पश्चिम आशियातील वाढत्या तणावामुळे जागतिक बाजारपेठांवर निर्माण झालेल्या दबावाचा परिणाम भारतीय शेअर बाजारावरही स्पष्टपणे दिसून आला. सोमवारी बीएसई सेन्सेक्स तब्बल १,८३७ अंकांनी (२.४६ टक्के) घसरून ७२,६९६ वर बंद झाला, तर एनएसई निफ्टी ५० निर्देशांक ६०२ अंकांनी (२.६ टक्के) घसरून २२,५१२ वर स्थिरावला. एप्रिल २०२५ नंतरची ही सर्वात नीचांकी बंद पातळी ठरली.

या घसरणीमुळे गुंतवणूकदारांचे मोठे आर्थिक नुकसान झाले. बीएसईवरील सूचीबद्ध कंपन्यांचे एकूण बाजार भांडवल शुक्रवारी ४२८.७६ लाख कोटी रुपयांवरून घसरून ४१५.२१ लाख कोटी रुपयांवर आले. परिणामी, काही तासांतच गुंतवणूकदारांच्या सुमारे १३.५ लाख कोटी रुपयांची संपत्ती नाहीशी झाली. व्यापक बाजारातही मोठी घसरण नोंदवली गेली. निफ्टी मिडकॅप १०० आणि निफ्टी स्मॉलकॅप १०० निर्देशांक सुमारे ४ टक्क्यांनी खाली आले. निफ्टी ५०० मधील केवळ १५ समभाग सकारात्मक क्षेत्रात बंद झाले, यावरून विक्रीचा दबाव किती व्यापक होता हे स्पष्ट झाले.

दरम्यान, पश्चिम आशियातील संघर्ष अधिक तीव्र होत असल्याने गुंतवणूकदारांमध्ये अस्वस्थता वाढली आहे. अमेरिकेकडून इराणला होर्मुझ सामुद्रधुनी खुली ठेवण्याचा इशारा देण्यात आला असून, तसे न झाल्यास ऊर्जा पायाभूत सुविधांवर हल्ल्याची चेतावणी देण्यात आली आहे. याला प्रत्युत्तर म्हणून इराणनेही आखातातील महत्त्वाच्या प्रकल्पांवर हल्ल्यांची धमकी दिली आहे. या संघर्षामुळे होर्मुझ सामुद्रधुनीतील वाहतूक बाधित झाली आहे. त्याता फटका बाजारांना बसत आहे.

### ब्रिक्स+ अध्यक्षपदाचा उपयोग का नाही?

## काँग्रेसकडून केंद्र सरकारवर टीका

■ दैनिक राज्य लोकतंत्र



**नवी दिल्ली :** पश्चिम आशियातील सुरू असलेल्या संघर्षाच्या पार्श्वभूमीवर काँग्रेसने केंद्र सरकारवर टीका करत भारताच्या आगामी ब्रिक्स+ अध्यक्षपदाचा प्रभावी वापर न केल्याचा आरोप केला आहे. या संकटावर समन्वित मुत्सद्दी पुढाकार घेण्यासाठी भारताने अधिक सक्रिय भूमिका घ्यावी, अशी मागणी करण्यात आली आहे.

काँग्रेसचे सरचिटणीस जयराम रमेश यांनी प्रश्न उपस्थित केला की, वर्षाअखेर नवी दिल्ली येथे होणारी ब्रिक्स+ शिखर परिषद पुढे आणून या गंभीर परिस्थितीवर चर्चा का करण्यात येत नाही. पश्चिम आशियातील तणावाच्या पार्श्वभूमीवर भारताने नेतृत्व दाखवण्याची गरज असल्याचे त्यांनी नमूद केले.

“पश्चिम आशियातील संकटाचा सामना करण्यासाठी भारताने राजनैतिक पुढाकार घ्यावा. शिखर परिषद लवकर घेऊन सर्व देशांना एकत्र आणण्याची संधी का साधली जात नाही?” असा सवाल त्यांनी केला. त्यांनी अमेरिकेचे माजी अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प आणि इस्रायलचे पंतप्रधान बेंजामिन नेतान्याहू यांच्याशी संबंध बिघडू नयेत म्हणून भारत सक्रिय पावले उचलत नसल्याचा आरोपही केला.

भारताच्या अध्यक्षतेखाली होणाऱ्या ब्रिक्स+ परिषदेत ब्राझील, रशिया, भारत, चीन, दक्षिण आफ्रिका यांसह अर्जेंटिना, इजिप्त, इथिओपिया, सौदी अरेबिया, इराण आणि संयुक्त अरब अमिराती यांचा समावेश आहे. या मंचाचा उपयोग करून संघर्षावर ठोस भूमिका मांडता आली असती, असे काँग्रेसचे मत आहे.

दरम्यान, केंद्र सरकारकडून पश्चिम आशियातील परिस्थितीवर विविध देशांच्या नेत्यांशी संवाद साधला जात असल्याचे सांगितले जात आहे. मात्र, फोनवरील चर्चांपेक्षा शिखर परिषदेत प्रत्यक्ष चर्चा अधिक प्रभावी ठरू शकते, असे रमेश यांनी नमूद केले.

पश्चिम आशियातील संघर्ष तीन आठवड्यांहून अधिक काळ सुरू असून परिस्थिती अद्याप तणावपूर्ण आहे. इस्रायल आणि इराण यांच्यातील हल्ले सुरूच असून सौदी अरेबियातही सुरक्षेच्या घटना घडत आहेत. अमेरिकेकडून अतिरिक्त सैन्य आणि युद्धनौका तैनात करण्यात आल्याने परिस्थिती अधिक गंभीर बनत आहे. या पार्श्वभूमीवर भारताने आपली राजनैतिक भूमिका अधिक स्पष्ट करावी आणि आंतरराष्ट्रीय स्तरावर सक्रिय हस्तक्षेप करावा, अशी मागणी काँग्रेसकडून करण्यात येत आहे.

## पश्चिम आशियातील तणावाच्या तीव्रतेत वाढ

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**नवी दिल्ली :** पश्चिम आशियातील सुरू असलेला संघर्ष अधिकच तीव्र होत असून इराणने ऊर्जा प्रकल्पांवर हल्ले झाल्यास आखात क्षेत्रात “अपरिवर्तनीय विनाश” घडवून आणण्याचा इशारा दिला आहे. तसेच, अमेरिकेकडून हल्ले झाल्यास हॉर्मुझ सामुद्रधुनी पूर्णपणे बंद करण्याची धमकीही देण्यात आली आहे. या घडामोडींमुळे जागतिक ऊर्जा सुरक्षेबाबत गंभीर चिंता व्यक्त होत आहे.

हॉर्मुझ सामुद्रधुनी हा जगातील सर्वात महत्त्वाचा तेल वाहतूक मार्ग मानला जातो. या मार्गावर कोणताही अडथळा निर्माण झाल्यास जागतिक स्तरावर तेल व वायू पुरवठ्यावर मोठा परिणाम होऊ शकतो. सध्या युद्धजन्य परिस्थितीमुळे या मार्गावरील जहाजांची हालचाल आधीच अडथळ्यांत सापडली असून व्यापारी वाहतुकीवर त्याचा परिणाम दिसून येत आहे. इराणने स्पष्ट केले आहे की, त्यांच्या ऊर्जा केंद्रांवर हल्ले झाल्यास ते आखात क्षेत्रातील वीज प्रकल्प, तेल पायाभूत सुविधा आणि अमेरिकेशी संबंधित ठिकाणांवर प्रत्युत्तरात्मक कारवाई करतील. त्यामुळे या संघर्षाचे स्वरूप अधिक व्यापक होण्याची शक्यता वर्तवली जात आहे. अमेरिकेकडून या सामुद्रधुनीतून वाहतूक सुरळीत ठेवण्याचा दबाव वाढत असताना इराणने ठाम भूमिका घेतल्याने तणाव वाढला आहे. संघर्षाच्या पार्श्वभूमीवर तेलाच्या किमतीत चढ-उतार सुरू असून जागतिक पुरवठा साखळीवरही परिणाम होत आहे. या संघर्षाचा परिणाम केवळ पश्चिम आशियापुरता मर्यादित नसून जागतिक अर्थव्यवस्था, ऊर्जा सुरक्षा आणि आंतरराष्ट्रीय व्यापारावरही होत आहे. तज्ज्ञांच्या मते, परिस्थिती नियंत्रणाबाहेर गेल्यास मोठ्या प्रमाणावर ऊर्जा संकट निर्माण होऊ शकते.

संघर्षाला तीन आठवड्यांहून अधिक काळ लोटला असून अमेरिका, इस्रायल आणि इराण यांच्यातील तणाव कमी होण्याची चिन्हे दिसत नाहीत. अतिरिक्त सैन्य तैनाती, क्षेपणास्त्र हल्ले आणि ऊर्जा केंद्रांवरील लक्ष्यीकरण यामुळे परिस्थिती अधिकच गंभीर बनली आहे. या पार्श्वभूमीवर आंतरराष्ट्रीय स्तरावर संवाद आणि मुत्सद्देगिरीद्वारे तोडगा काढण्याची गरज अधोरेखित होत आहे.

### मागणीअभावी सोन्याच्या भावात लक्षणीय घसरण

**नवी दिल्ली :** देशांतर्गत मागणी कमी झाल्याने आणि जागतिक स्तरावर कमकुवत कल असताना सोमवारी राष्ट्रीय राजधानीत सोन्याचे दर ९,०५० रुपयांनी घसरून १.४३ लाख रुपये प्रति १० ग्रॅम झाले, तर चांदीचे दर १०,५०० रुपयांनी घसरून २.३० लाख रुपये प्रति किलो झाले. ऑल इंडिया सर्राफा असोसिएशनने दिलेल्या माहितीनुसार, ९९.९ टक्के शुद्धता असलेल्या सोन्याचे दर ९,०५० रुपये किंवा सुमारे ६ टक्क्यांनी घसरून १,४३,६०० रुपये प्रति १० ग्रॅम झाले.

## ‘वनवासी’ शब्दाने आदिवासींची ओळख धूसर

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**अहमदाबाद :** भाजप आणि राष्ट्रीय स्वयंसेवक संघ ‘आदिवासी’ ऐवजी ‘वनवासी’ हा शब्द वापरून आदिवासींची मूळ ओळख कमकुवत करत आहेत, असा आरोप काँग्रेस नेते आणि विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांनी केला. गुजरातमधील वडोदरा येथे आयोजित ‘आदिवासी अधिकार संविधान संमेलन’मध्ये ते बोलत होते.

राहुल गांधी म्हणाले की, आदिवासी हे देशाचे मूळ मालक असून त्यांच्या जल, जंगल आणि जमिनीवरील हक्कांची ओळख पुसण्याचा प्रयत्न भाषेच्या माध्यमातून केला जात आहे. “‘आदिवासी’ म्हणजे या भूमीचे मूळ मालक, तर ‘वनवासी’ हा शब्द त्यांचे हक्क नाकारण्याचा प्रयत्न आहे,” असे त्यांनी स्पष्ट केले.


ते पुढे म्हणाले की, इतिहासात आदिवासींकडून जमीन हळूहळू हिरावली गेली असून आता नव्या शब्दप्रयोगांद्वारे त्यांची ओळखच बदलण्याचा प्रयत्न केला जात आहे. हा विचार बिरसा मुंडा यांच्या वारशावर आघात करणारा असल्याचेही त्यांनी नमूद केले. आदिवासींना सत्तेत आणि संपत्तीत योग्य वाटा मिळावा यासाठी जातीजनगणना आवश्यक असल्याचे त्यांनी सांगितले.

राहुल गांधी यांनी खासगीकरणामुळे आदिवासींचे संरक्षण कमी होत असल्याचा आरोप केला. सरकारी शाळा व महाविद्यालये मजबूत नसल्यास आदिवासी मुलांना दर्जेदार शिक्षण मिळणार नाही, असेही ते म्हणाले.

## शेतकऱ्यांसाठी विविध आर्थिक उपायांवर सरकारचा भर

# संपूर्ण कर्जमाफीचा प्रस्ताव नाही – सीतारामन

■ दैनिक राज्य लोकतंत्र



**नवी दिल्ली :** देशातील शेतकऱ्यांसाठी संपूर्ण कर्जमाफीचा कोणताही प्रस्ताव केंद्र सरकारकडे विचाराधीन नसल्याचे केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांनी सोमवारी संसदेत स्पष्ट केले. तथापि, शेतकऱ्यांची आर्थिक स्थिती बळकट करण्यासाठी केंद्र सरकारकडून विविध योजनांद्वारे व्यापक मदत दिली जात असल्याचे त्यांनी अधोरेखित केले.

सीतारामन म्हणाल्या की, किसान क्रेडिट कार्ड (केसीसी) योजनेच्या माध्यमातून शेतकऱ्यांना वेळेवर आणि पुरेसा पतपुरवठा सुनिश्चित केला जात आहे. सुधारित व्याज सवलत योजनेअंतर्गत ३ लाख रुपयांपर्यंतचे पीक कर्ज अनुदानित व्याजदराने उपलब्ध करून दिले जाते. यामध्ये कर्जाची वेळेवर परतफेड करणाऱ्या शेतकऱ्यांना अतिरिक्त सवलती व प्रोत्साहन दिले जाते, ज्यामुळे कर्जभार कमी करण्यास मदत होते. याशिवाय, रिझर्व्ह बँक ऑफ इंडियाच्या प्राधान्य क्षेत्र कर्ज मार्गदर्शक तत्त्वांनुसार कृषी क्षेत्रासाठी कर्जपुरवठा वाढविण्यावर भर देण्यात आला आहे. तारणमुक्त अल्पकालीन कृषी कर्जाची मर्यादा १.६० लाख रुपयांवरून २ लाख रुपयांपर्यंत वाढवण्यात आली आहे. त्यामुळे लघु आणि मध्यम शेतकऱ्यांना सुलभ कर्जप्राप्ती होण्यास मदत होत असल्याचे त्यांनी नमूद केले.

सरकारकडून प्रधानमंत्री किसान सन्मान निधी (पीएम-किसान) योजनेद्वारे पात्र शेतकऱ्यांना थेट आर्थिक मदत दिली जात आहे. तसेच पीक विमा योजनांद्वारे नैसर्गिक आपत्ती किंवा इतर कारणांमुळे होणाऱ्या नुकसानापासून संरक्षण देण्याचा प्रयत्न करण्यात येत आहे. या सर्व उपाययोजनांमुळे शेतकऱ्यांच्या उत्पन्न स्थैर्याला हातभार लागतो, असेही त्यांनी स्पष्ट केले.

दरम्यान, सशस्त्र दलातील अपंगत्व पेन्शनबाबतही अर्थमंत्र्यांनी स्पष्टीकरण दिले. प्राप्तिकर कायदा, १९२२ अंतर्गत देण्यात आलेली करसवलत कायम असून, नवीन प्राप्तिकर कायदा २०२५ लागू झाल्यानंतरही ती अबाधित ठेवण्यात आली आहे. वित्त विधेयक २०२६ मध्ये या संदर्भात स्पष्ट तरतूद करून पूर्वीप्रमाणेच सवलतीची सातत्यता राखण्यात आली असल्याचे त्यांनी सांगितले. ३१ जानेवारी २०२६ पर्यंत सशस्त्र दलातील १,४७,२६३ कर्मचारी अपंगत्वाच्या श्रेणीत निवृत्त झाले असून, त्यापैकी ८९,५९८ कर्मचारी अपंगत्व पेन्शन घेत आहेत. या कर्मचाऱ्यांची वैद्यकीय तपासणी दरवर्षी केली जाते. त्यामध्ये शारीरिक व वैद्यकीय स्थितीचे सखोल परीक्षण केले जाते. आवश्यकतेनुसार वैद्यकीय मंडळांकडून त्यांचे वर्गीकरण निश्चित केले जाते आणि त्यानुसार सेवा व निवृत्तीचे निर्णय घेतले जातात.

सीतारामन यांनी स्पष्ट केले की, नव्या कायद्यातील तरतुदींचा उद्देश कोणतीही नवीन कर आकारणी करणे नसून विद्यमान सवलती कायम ठेवणे हा आहे. त्यामुळे अपंगत्व पेन्शनवरील करसवलत बंद करण्यात आलेली नसून ती पुढेही सुरू राहणार आहे.

एकूणच, सरकारने शेतकऱ्यांसाठी कर्जमाफीऐवजी कर्जसुलभता, थेट आर्थिक मदत आणि विमा संरक्षण यावर भर दिला आहे.